१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, शनिवार २ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३१६, पाने-८, किंमत : ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 316, Marathi - Daily - Pune, 2 August, 2025 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## प. बंगालमधील दुर्गापूजा मंडळांना १ लाख १० हजार अनुदान



**कोलकाता -** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यावर्षी दुर्गापूजा समित्यांसाठी मदत जाहीर केली आहे. कोलकात्याच्या नेताजी इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की यावर्षी राज्य सरकार प्रत्येक दुर्गा पूजा समितीला १ लाख १० हजार रुपयांची आर्थिक मदत देईल. गेल्या वर्षी दिलेल्या ८५ हजारांपेक्षा ही रक्कम २५ हजारांनी जास्त आहे.राज्यातील ४० हजार दुर्गापूजा त्याचा लाभ मिळणार आहे. वीजबिलातही ८० टक्के सूट देण्याचे निर्देश दिले आहेत. यंदा दुर्गापूजा ५ ऑक्टोबरला सुरू होणार असून विसर्जन २ ते ४ ऑक्टोबरदरम्यान होईल. महाराष्ट्रातील गणेशोत्सव मंडळांनाही अशा प्रकारे सरकार अनुदान देणार का, अशी चर्चा आता गणेशभक्तांमध्ये सुरू झाली आहे.

# ऑर्केस्ट्राचा परवाना परत केला बारचा ठेवला! कदमांवर पुन्हा टीका




**सावली बार प्रकरणावरून अडचणीत आलेले शिंदे गटाचे आमदार व गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या कुटुंबाची या प्रकरणी पुरती नाचक्की झाल्यावर त्यांनी आज सावली बारचा ऑर्केस्ट्राचा परवाना सरकारला परत केला. मात्र, त्यांनी रेस्टोबार आणि हॉटेलचा परवाना अजूनही आपल्याकडे ठेवला आहे. त्यावरूनही विरोधकांनी त्यांना धारेवर धरत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी पुन्हा केली आहे. त्या बारवर तीनदा धाडी पडल्या तरी परवाना धारक कदम कुटुंबावर कारवाई का झाली नाही, असा सवाल उबाठाचे अनिल परब यांनी विचारला.**

### दमानिया कदमांविरुद्ध कायदेशीर लढाई लढणार

सावली बारचे प्रकरण चर्चेत असतानाच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी कदम कुटुंबाविरुद्ध कायदेशीर लढाई लढणार असल्याचे म्हटले आहे. त्या म्हणाल्या की, कदम कुटुंबियांच्या सर्व शैक्षणिक संस्था, कंपन्या, योग, सिद्ध अशा नावाने असलेल्या विविध डेव्हलपमेंट कंपन्यांची कुंडली मी काढली आहे. त्यांच्या कंपन्यांचे कुठे कुठे प्रकल्प सुरू आहेत, त्याचे तपशील, रत्नागिरीमधील त्यांच्या शैक्षणिक संस्थांची संपूर्ण माहिती गोळा केली आहे. माझ्यापर्यंत प्रचंड प्रमाणात माहिती आली आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार समोर आले आहेत. या सगळ्या माहितीचा अभ्यास करून मी त्यांच्या विरोधात न्यायालयात लढा देणार आहे.

■ मुंबई

**मुंबईतील** कांदिवली येथील सावली बारवर मुंबई पोलिसांनी काही दिवसांपूर्वी धाड टाकली होती. या बारमधून २२ बारबाला आणि चार कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले होते. या बारचा परवाना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावावर असल्याचे त्यावेळी उघड झाले होते. विधानपरिषदेचे उबाठाचे आमदार अनिल परब यांनी या विषयावर सभागृहात आवाज उठवला होता. त्यांनी या बारचा परवाना योगेश कदम यांच्या कुटुंबीयांच्या नावावर असल्याचे सांगून त्याची कागदपत्रे सादर केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगेश कदम यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली होती. या प्रकरणी टीका झाल्यावर योगेश कदम यांचे वडील आणि माजी मंत्री रामदास कदम यांनी खुलासा केला » पान ७ वर

# चौफुल्यात ठोय ठोय करू नका अजित पवार यांचे बेफाम वक्तव्य

■ पुणे

**पुणे** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कार्यक्रमात भाषण करताना अजित पवार म्हणाले की, तुम्ही आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहात. तुमच्याकडून कोणतीही चूक होऊ देऊ नका. चौफुल्याला तडफडू नका. कुठे जाऊन ठोय ठोय गोळीबार करू नका. ढगात गोळ्या झाडू नका. त्यामुळे पक्षाची बदनामी होते. विशेष म्हणजे ज्यांच्या भावावर चौफुल्यात गोळीबाराचा आरोप आहे ते आमदार शंकर मांडेकर यांच्या समोरच अजित पवारांनी ही तंबी दिल्याने याची जोरदार चर्चा होत आहे.

भोरचे आमदार शंकर मांडेकर यांच्या भावाला काही दिवसांपूर्वी चौफुला येथील कला केंद्रात गोळीबार केल्याबद्दल अटक करण्यात आली होती, या प्रकरणामुळे राज्यात खळबळ उडाली होती. मांडेकर यांच्या भावावर गुन्हाही दाखल झाला होता. आज पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत मांडेकर यांच्या मतदारसंघातील काही कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात अजित पवारांनी वैष्णवी हगवणे प्रकरणावरदेखील भाष्य केले. ते म्हणाले की, काही जण



**राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज आपल्या पक्षाचे नेते व कार्यकर्त्यांची कानउघाडणी केली. जपून बोला असा संदेश कार्यकर्त्यांना देताना तेच बेफाम बोलले.**

चुकीच्या पद्धतीने आरोप करत आहेत. कोणाच्या घरात काय घडले, कोणाला त्रास दिला गेला, हा सगळा तपासाचा विषय आहे. पण आमच्यावर गरज नसताना बोट दाखवणे चुकीचे आहे. आम्ही लग्नाला उपस्थित राहिलो, तर त्यात आमचा काय दोष? आम्ही त्यांना सुनेला त्रास द्यायला सांगितला का? उद्या सरपंचाच्या घरी लग्न असेल. त्याने बोलावले तर आम्ही जाणार. आम्हाला काय माहिती, तो पुढे काय दिवा लागणार आहे. आम्हाला माहिती असेल तर आम्ही नाही जाणार. उपमुख्यमंत्री म्हणून काम करताना मी नीट वागले आणि बोलले पाहिजे. माझ्या प्रत्येक शब्दाचे शूटिंग चालू आहे. पूर्वी म्हणता यायचे की, मी असे बोललो नाही. कारण काही पुरावा नसायचा. तो ३५ वर्षांपूर्वीचा काळ गेला. आता लगेच दाखवतात, बघा काय बोलला? आणि ते एकदा नाही तर तेच तेच तेच... लोक म्हणतात, हा कितीदा बोलला आणि काय सांगतो, बोलला नाही. असे टेक्निक चालू आहे. त्यामुळे तारतम्य ठेवून बोला. लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. लोक म्हणतात की, हा बोलला म्हणजे नक्की आता आपले काम होणार. आता जबाबदारी वाढल्यापासून मी चांगले बोलायचा प्रयत्न करतो. आता बघा, मी सगळ्यांना फोटो काढू दिले. शेवटी मला तुमची आणि तुम्हाला माझी गरज आहे. आपण एक परिवार झालो आहोत. एकमेकांचा दुस्वास करायला एकत्र आलेलो नाही.

## लाडकी बहीणच्या जुलै हप्त्यासाठी सामाजिक न्यायचे ४१० कोटी वळवले

■ मुंबई

**शासनाला** सत्तेत आणणारी लाडकी बहीण योजना आता शासनालाच जड जात असून लाडक्या बहिणींना जुलै महिन्याचा हप्ता देण्यासाठी पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाच्या ४१० कोटी रुपयांचा डल्ला मारण्यात आला आहे. राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीच्या विविध योजनांसाठी ठेवलेला हा निधी वळवल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे.

राज्य सरकारने सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचा तब्बल १ हजार ८२७ कोटींचा निधी आतापर्यंत लाडकी बहीण



योजनेसाठी वळवला आहे . एका फटक्यात विट्स हॉटेल विकत घेणारे या खात्याचे मंत्री संजय शिरसाट आपल्या खात्याचा निधी यावेळीही वाचवू शकलेले नाहीत. याआधी आदिवासी विभाग , मग सामाजिक न्याय विभाग आणि आता पुन्हा सामाजिक न्याय विभागाचा निधी घेतला गेला आहे.

लाडकी बहीण योजनेचे जुलै महिन्याचा हप्ता अद्याप देण्यात आला नाही. याच हप्त्यासाठी सामाजिक न्याय विभागाचा ४१० कोटींचा निधी वळवला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये विविध पद्धतीने छाननी करुन » पान ७ वर

## उद्धव ठाकरे ३ दिवसीय दिल्ली दौऱ्यावर जाणार

■ मुंबई

**आगामी** विधान सभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या बैठकीसाठी उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे येत्या ६ ते ८ ऑगस्ट दरम्यान दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज खासदार संजय राऊत यांनी मातोश्री निवासस्थानी जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या घडामोडी आणि उद्धवआणि राज ठाकरे या दोन बंधूंच्या एकत्र येण्यामुळे बदललेली राजकीय समीकरणे या दृष्टीने इंडिया आघाडीची ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. भविष्यात उद्धव आणि राज निवडणुकीसाठी एकत्र येणार असतील तर महाविकास आघाडी राज ठाकरे यांचे स्वागत करेल का, हा प्रश्न आहे. इंडिया आघाडी ही देश पातळीवर आणि राज्याच्या स्तरावर महाविकास आघाडी किंवा त्यातील घटक पक्षांनी स्वतंत्र निर्णय घ्यावेत का, यासंदर्भात या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

## कोकाटेंचे फक्त खाते का बदलले? अजित पवारांनी स्पष्टीकरण द्यावे

छावा संघटनेची मागणी

■ पुणे

**विधानसभेत** ऑनलाइन रमी खेळल्याच्या प्रकारानंतर मंत्री माणिकराव कोकाटे यांचे कृषी खाते काढून घेण्यात आले. मात्र, त्यांना क्रीडा व युवक कल्याण खाते देण्यात आल्याने महायुती सरकारवर टीका होत आहे. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला असून कोकाटे यांच्या राजीनाम्याचे आश्वासन दिले होते ते का पाळले नाही? असा सवाल उपस्थित करत खाते बदलण्यावर स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी केली आहे.

विजयकुमार घाडगे म्हणाले



की, माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा का घेतला नाही ? तुम्ही त्यांची नियुक्ती क्रीडा खात्यावर केली, हा अत्यंत चुकीचा निर्णय आहे. असंवेदनशील व्यक्तीला तुम्ही मंत्रिपद दिले आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे.

देवेंद्र फडणवीस या मंत्रिबदलावर म्हणाले की, रमीच्या घटनेनंतर मोठा रोष निर्माण झाला होता. त्या संदर्भात अजित पवार आणि एकनाथ शिंदे अशी सगळ्यांनी चर्चा केली आणि त्यांचे खाते बदलले. मंत्र्यांनी बेशिस्त वर्तन केले तर कारवाई करणार. धनंजय मुंडेंनी तीन वेळा माझी भेट घेतली आहे. त्यात मंत्रिपदाबद्दल चर्चा झाली नाही. मंत्रिपदाची चर्चा धनंजय मुंडे यांच्या स्तरावर होत नाही. » पान ७ वर

## अनिल अंबानींच्या अडचणीत वाढ ईडीकडून समन्स! मंगळवारी चौकशी

■ मुंबई



**उद्योगपती** अनिल अंबानी पुन्हा एकदा अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) रडारवर आले आहेत. १७,००० कोटी रुपयांच्या कथित कर्ज घोटाळ्याप्रकरणी ईडीने त्यांना चौकशीसाठी समन्स बजावले असून, ५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील ईडी मुख्यालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याआधी, गेल्या आठवड्यात मुंबईतील त्यांच्या ३५ हून अधिक ठिकाणी ईडीने छापे टाकले होते. त्यानंतर हे समन्स बजावण्यात आले आहेत. त्यामुळे अंबानी यांच्या अडचणींमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. २०१७ ते २०१९ दरम्यान येस बँकेने त्यांच्या कंपन्यांना सुमारे ३,००० कोटी रुपयांचे बेकायदेशीर कर्ज मंजूर केले होते. यामध्ये रिलायन्स पॉवर आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपन्यांचा समावेश आहे. मात्र, या कंपन्यांनी स्टॉक एक्सचेंजला दिलेल्या निवेदनात, या छाप्यांचा त्यांच्या कामकाजावर कोणताही परिणाम झालेला नसल्याचे म्हटले आहे.

## दौंडच्या यवतमध्ये दोन गटात दगडफेक आक्षेपार्ह पोस्टनंतर तणावाचे वातावरण

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील यवत गावात आज व्हॉट्सपवरील एका आक्षेपार्ह पोस्टवरून दोन गटांत तणाव निर्माण झाला. या घटनेनंतर आक्रमक झालेल्या जमावाने दगडफेक, दुचाकींना आग लावणे आणि प्रार्थनास्थळाची तोडफोड केली. यवत पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली.



यवतमधील नीलकंठेश्वर मंदिरात २६ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केल्याची घटना ताजी असतानाच एका समुदायाच्या तरुणाने व्हॉट्सपवर एक आक्षेपार्ह पोस्ट केली. या पोस्टची माहिती मिळताच गावात तणाव निर्माण झाला. त्यानंतर दुपारी १२ वाजताच्या सुमारास यवतचा आठवडी बाजार बंद करण्यात आला. » पान ७ वर

## उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबरला निवडणूक

अर्ज भरण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट

■ नवी दिल्ली

**माजी** उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी काही दिवसांपूर्वी प्रकृतीच्या कारणामुळे तडकाफडकी पदाचा राजीनामा दिल्यानंतर नव्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणूक आयोगाने आज निवडणुकीची घोषणा केली असून ९ सप्टेंबर रोजी मतदान आणि मतमोजणी होणार आहे.

या निवडणुकीसाठी २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेचे मिळून एकूण ७८२ सदस्य मतदान करतील. यामध्ये लोकसभेचे ५४२ आणि राज्यसभेचे २४० सदस्य आहेत. बहुमतासाठी ३९४ मते मिळवणे आवश्यक आहे. सध्याच्या संसदीय स्थितीचा विचार करता राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) पारडे जड मानले जात आहे. दोन्ही सभागृहांतील मिळून एनडीएकडे सुमारे ४२२ खासदारांचे संख्याबळ आहे, जे आवश्यक बहुमतापेक्षा अधिक आहे. त्यामुळे एनडीएचा उमेदवार सहज विजय मिळवेल, असा अंदाज आहे.

## शिवसेना पक्ष-चिन्हावर तातडीच्या सुनावणीला सुप्रीम कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**शिवसेना** पक्ष-चिन्ह कोणाचे., या मुद्द्यावर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने आज नकार दिला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने केलेली ही मागणी फेटाळल्याने, उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे.



आज सकाळी ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी न्यायालयासमोर या प्रकरणाचा उल्लेख करत तातडीच्या सुनावणीची विनंती केली. स्थानिक निवडणुका जवळ आल्यामुळे, पक्षाचे नाव आणि चिन्ह यावरील स्पष्टता आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र न्यायालयाने ही विनंती फेटाळत तातडीच्या सुनावणीस नकार दिला. यापूर्वी हे प्रकरण २० ऑगस्टला सूचीबद्ध होते, परंतु आता या दिवशीही सुनावणी अनिश्चित आहे. कारण या प्रकरणाची सुनावणी करणारे न्या. सूर्य कांत हे १९ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या एका अन्य घटनापीठाचे सदस्य आहेत. यामुळे दोन्ही प्रकरणांची एकाच वेळी सुनावणी अशक्य आहे.

## दुधाच्या खरेदीदरात एक रुपयाने वाढ

■ पुणे

**पुणे** जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (कात्रज दूध संघ) गाय दूध खरेदी दरात आजपासून प्रतिलिटर १ रुपयांची वाढ लागू करण्यात आली. ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ असलेल्या दूधाचा खरेदी दर ३२ रुपयांवरून ३३ रुपये इतका करण्यात आला आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनंतर संघाच्या व्यवस्थापन समितीची बैठक झाली. या बैठकीत खरेदी दारात एक रुपयाने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना थोडा आर्थिक दिलासा मिळणार आहे. मात्र, ग्राहकांसाठीच्या विक्री दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

## मतांच्या चोरीचा आमच्याकडे ठोस पुरावा

■ मुंबई

केंद्रीय निवडणूक आयोग मतांची चोरी करत आहे. याचा आमच्याकडे ठोस पुरावा असून तो बाहेर काढल्यास मोठा धमाका होईल, असा घणाघात विरोधी पक्ष नेते व काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे पुनर्पडताळणी केल्यानंतर आज या याद्या प्रकाशित करण्यात आल्या. त्या संदर्भात राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक आयोग मतदार याद्यांमध्ये गडबड करून मतांची चोरी करत आहे. मी हे उगाच बोलत नाही. माझ्याकडे ठोस पुरावे आहेत. आयोग केवळ भाजपासाठी काम करत आहे. हे काम करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. त्यांना शोधून काढू ते सेवानिवृत्त झाले तरी त्यांचा पर्दाफाश करणार. या गैरप्रकारातील तथ्ये जेव्हा आम्ही जनतेसमोर आणू तेव्हा सगळ्यांना कळेल की आयोग कशाप्रकारे काम करत आहे. मध्य प्रदेशात आम्हाला पहिल्यांदा संशय

### राहुल गांधींचा दावा

आला. महाराष्ट्राच्या निवडणुकीत तो अधिक बळावला. त्यानंतर आम्ही सहा महिन्यांपासून यातील गैरप्रकारांचा शोध घेतला. त्यातून आमच्या हाती जे लागले आहे, ते लोकांसमोर आणले तर मोठा स्फोट होईल. या देशात निवडणूक आयोगच राहणार नाही. आयोगाने तब्बल एक कोटी नवीन मतदारांची भर घातली आहे.

## माघी गणेशोत्सवातील रखडलेले विसर्जन अखेर आज होणार

■ मुंबई

**माघी** गणेशोत्सवात रखडलेल्या प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी)च्या उंच गणेशमूर्तींच्या नैसर्गिक जलस्रोतात विसर्जनास मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. त्यामुळे तब्बल १७७ दिवसांपासून विसर्जनाच्या प्रतीक्षेत असलेल्या कांदिवलीच्या डहाणूकरवाडीचा श्री आणि चारकोपच्या राजा या दोन महत्त्वाच्या गणेशमूर्तींचे उद्या विसर्जन होणार आहे. मुंबई महानगरपालिकेने कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जनाची व्यवस्था केली होती. मात्र संबंधित मंडळांनी यास नकार देत न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायालयाच्या निकालानंतर दोन्ही मंडळांनी समाधान व्यक्त केले आहे. उद्या दुपारी १ वाजता चारकोप सेक्टर १ येथून मिरवणुकीस सुरुवात होणार आहे.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251722}

विलेपार्ले (पश्चिम) येथे मिठीबाई कॉलेजमध्ये प्यून (महिला-पुरुष) पाहीजेत.पत्ता:- 414, ई - विंग, 4 था माळा, झी-शान,एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व). मो. **9820426010, 9833313217** {NC251777}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत. पगार 26219/- + अधिक सुविधा **9224216144 / 9869576582** {NC251779}

इलेक्ट्रीक कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 12000/- ते 21000/- गाडीभाडे मिळेल. **9820432870 / 9819017461** {NC251768}

नविन हॉस्पिटलकरिता हाऊसकिपिंग महिला व पुरुष पाहिजेत. सुरज वॉटर पार्कजवळ ठाणे (वेस्ट), **8180091545 / 9270429106** {NC251803}

पाहिजे सिक्युरीटी गार्ड, हाऊसकिपिंग व बाऊन्सर. संपर्क करा - **9619115448** {NC251776}

वायरमॅन आणि हेल्पर पाहिजेत. त्वरित संपर्क करा. उदया : **9820478170.** {NC251421}

सिक्युरिटी गार्ड/ हाऊसकिपींग, जेन्ट्स, लेडीज पाहिजेत. सायन, दादर, वरळी, गोवंडी, मालाड, चुनाभट्टी लोअर परेल. **8291056761/ 8422880515/ 8422880514** {NC251671}

सीडी मशीनसाठी प्रिंटर फिडरमन, बॉयलर, पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, कटर पाहिजेत. संपर्क : **9820930362 / 9930589715** {NC251697}

कांदिवलीतील प्रिंटिंग/पॅकेजिंग कंपनी मध्ये ऑफसेट प्रिंटर (हाइडेलबर्ग २- कलर/ 28x40/ सीडी, सीपी ट्रॉनिक मशीन), फीडर, फॉइलिंग ऑपरेटर, जुनिअर आणि सिनियर प्रोडक्शन सुपर्व्हिसर, प्री-प्रेस ऑपरेटर पाहिजे **+917506719548**{NC251623}

## पाहिजेत

पेस्टकंट्रोल कामासाठी अनुभवी/ बिनअनुभवी मुले त्वरित पाहिजे. संपर्क : **9833523290** (कांदिवली) {NC251752}

बोरीवली पूर्वमध्ये इमिटेशन ज्वेलरीच्या कंपनीत डायमंड चिटकवायला मुली पाहिजेत. पगार योग्यतेनुसार. वय 35 पर्यंत संपर्क : कार्टररोड नंबर-2, शताब्दी हॉस्पिटलजवळ स्टेशनपासून 5 मिनिटांवर, बोरिवली (पूर्व) **7977369456** (वेळ - 10.00-6.00) {NC251668}

पंचींग मशीन ऑपरेटर आणि 4 कलर (20 x 28) हेडलबर्गसाठी प्रिंटर, बॉयलर, फिडरमेन (संपुर्ण टीम) पाहिजेत. सुमंगल प्रिंटर्स, भांडुप (वेस्ट ) : **9867316567.** {NC251727}

अनुभवी इलेक्ट्रिशियन वायरमन पाहिजेत. **9820038663** न्यू स्वस्तिक इलेक्ट्रिक, घाटकोपर वेस्ट {NC251748}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले/मुली पाहिजे. जय गणेश, गाळा नंबर - 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105 / 9137518551** {NC251687}

आमच्या कुर्ला फॅक्टरी येथे डुप्लेक्स आणि कोरुगेटेड बॉक्ससाठी पंचिंग/डाय कटिंग मशिन ऑपरेटर पाहिजेत. संपर्क - **9819015592** {NC251699}

घरकाम करण्यासाठी, बोरिवली पूर्व येथे 24 तासासाठी मुलगा पाहिजे. **8879897148** {NC251743}

बोरिवली पश्चिम येथे हायड्रॉलिक प्रेसच्या सर्विस आणि रिपेअरिंगसाठी हायड्रोलिक इंजिनिअर/वर्कर पाहिजेत. **9820477791** {NC251770}

मरीनलाईन्स ऑफिसमध्ये लेडी प्यून पाहिजे. वय 30 पर्यंत, शिक्षण 10वी, वेळ - (9.30 - 6.30) पगार (8000-9000) परमनंट जॉब. ॲडव्होकेट जैन - **9820113939** {NC251767}

## पाहिजेत

बोरिवली पश्चिम येथे कारखान्यात डाय मेकर कारागीर आणि मदतनीस पाहिजेत. **9820477791** {NC251769}

दादर येथील संस्थेला रात्री 8 ते सकाळी 8 या वेळेसाठी वॉचमन हवा आहे. पत्ता :- ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर, बाळ गोविंददास रोड, लक्ष्मीनारायण बाग हॉलसमोर, माहिम, मुंबई - 400016. संपर्क - **9869352134** {NC251771}

वसई पूर्व (तुंगारफाटा) स्थित फॅक्टरीसाठी ऑफिस असिस्टंट पाहिजेत. शिक्षण बारावी पास. पगार 13,000/- ते 15,000/- वेळ 8.30 ते 7 pm **8698522629 / 8605233061** {NC251782}

अंधेरी कुरिअरला, बँक टू बँक डिलिव्हरी, पिकअप, मार्केटिंग, कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत - **8879337077** {NC251786}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. 16 ते 23000 पगार 8 ते 12 Tass **9082542026** {NC251821}

कोरोगेशन ऑपरेटर/ शीटपॉस्टर/ पिनिंग ऑपरेटर/ हेल्पर पाहिजेत. जेनसिस इंडस्ट्रियल एस्टेट, पालघर मधील एक कोरोगेशन फॅक्ट्री . Mob - **9223352481**. {NC251822}

दुबईमध्ये (पासपोर्ट असणारी) महिला पाहिजे) चांगल्या जेवणाचा - घराच्या कामासाठी. (अनुभवी) (पगार- 70,000/-) **9819402940 / 8928028553.** {NC251815}

मुलुंडमध्ये क्लाससाठी गाणी / इन्स्ट्रुमेंट्स / नृत्य शिकवण्यासाठी टीचर पाहिजेत. **9821575352 / 9699987575** {NC251818}

मालवणी पद्धतीचे ४ माणसांचे जेवण करणारी व घरातील साफसफाई करण्यासाठी बाई पाहिजे. दादर ते अंधेरी प्राधान्य. संपर्क :- सांताक्रुझ ( पूर्व ) **9920058068**. {NC251820}

कोमोरी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर आणि हेल्पर पाहिजेत. ठाणे **-9892636100/ 9819410350** {NC251823}

मुलगी/बाई पाहिजे ऑफीस कामासाठी आणि टायपिंग 40wpm. **9004502451** {NC251816}

अंधेरी वेस्ट कपड्यांच्या शोरूमसाठी सेल्समेन/ सेल्सगर्ल अनुभवी/ बिनअनुभवी पाहिजे **8080669968** {NC251814}

## पाहिजेत

वायरमन/हेल्पर गोरेगाव पूर्व येथे कामाला पाहिजेत, अर्ध/ पूर्णवेळ, संपर्क- **9892780672** {NC251813}

बोरीवली (इस्टमध्ये) इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार. **9773156336/ 9664258154** {NC251819}

बोरीवलीत ऑफीस कामासाठी मुले पाहिजेत. (HSC). बोरीवली ते अंधेरी राहणाऱ्यांना प्राधान्यः **9819628267** {NC251812}

हाउसकीपिंग कम प्युन पाहिजे अंधेरी ईस्ट स्टेशनजवळील इन्स्टिट्यूटसाठी. वेळ: सकाळी ९ ते संध्या ६.३०. तात्काळ नोकरी. संपर्क **9323388196**{NC251806}

वाशी नवीमुंबई येथील एका नामांकीत हॉस्पिटलकरिता अनुभवी वॉर्डबॉय व आयाबाई पाहिजेत. पगार 21000 ड्युटी 12 तास संपर्क **9167785544/ 9967724688** {NC251807}

बारावी पास मुले पाहिजेत. पगार-12000/- कायमस्वरुपी नोकरी वय 30 पर्यंत. शिवडी **9820946244** {NC251808}

केअर टेकर म्हणून म्हातारी माणसं संभाळण्यासाठी २४ तास बाई आई. सी कॉलोनी बोरिवली मध्ये पाहिजे **-8108283892** {NC251809}

महाराष्ट्रीयन २ जणांच्या कुटुंबासाठी २४ तासांसाठी पुरुष हवा. घरकाम दादर (पश्चिम) कामाचे स्वरुपः घर साफ करणे, लादी पुसणे, भांडी घासणे, कपडे धुणे. पगारः 12000/-, राहण्याची, नाश्ता-जेवणाची सोय. संपर्कः चेतन ट्रेडर्स, सी-१२, शॉप नं.२, कस्तुरचंद मिल कंपाऊंड, लक्ष्मी कमर्शियल बिल्डिंगमागे, मनीष मार्केटजवळ, सेनापती बापट मार्ग, दादर (प.) **9324388020** {NC251810}

शाळेसाठी पार्ट टाईम लेडीस क्रीडा असिस्टंट.चेंबूर, मालाड, कांदिवली.: **9322024796.** {NC251830}

भांडुप येथील स्मॉल ट्रेडिंग कंपनीला विविध ऑफिस आणि आउटडोअर कामासाठी ऑफिसबॉय पाहिजे. कमीतकमी शिक्षण १२ वी पास, वय ३५पर्यंत. संपर्कः **9820424051** {NC251824}

इमिटेशन ज्वेलरी शोरूमसाठी सेल्स गर्ल आणि पॅकिंगसाठी मुलगी पाहिजे.-झवेरी बाजार- **9820392333.** {NC251825}

घाटकोपरमध्ये मॅटर्निटी हॉस्पिटलसाठी अनुभवी आया मावशी व नर्सेस पाहिजेत. **9920873044** {NC251826}

## पाहिजेत

CTP ऑपरेटर त्वरीत पाहिजेत. घाटकोपर, मुंबई . संपर्क :- **8921734979**. {NC251827}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी/टीचर/ गृहिणी पाहिजेत. पगार+ पीएफ. **9670731420** {NC251828}

बॅनर बनविण्यासाठी DTP OPERATOR पाहिजेत, अंधेरी पूर्व, संपर्क- **9870404424** {NC251831}

ट्रॉंबे पब्लिक हायस्कूल (हिंदी माध्यम) या ६०% अनुदानित शाळेसाठी इंग्रजी विषयासाठी B.A. B.ed, DSM मुख्याध्यापक पदासाठी मराठी भाषेचे ज्ञान असलेला इच्छुक उमेदवार दि. १२/८/२०२५ रोजी अर्जासह मुलाखतीस येऊ शकतो. वेळ सकाळी ११.०० ते ३.०० पता:-१५२-A,चिता कॅम्प, बी-सेक्टर एम.जी.आर. रोड, ट्रॉंबे , मुंबई-४०००८८ मोबाईल **9820669741** {NC251832}

पेस्ट कंट्रोल ऑपरेटरसाठी अनुभवी/बिनअनुभवी कामगार पाहिजेत. गिरगाव **9820534868/ 9833832512** {NC250051}

## Situation Vacant

REQUIRED MALE / FEMALE OFFICE ASSISTANT AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM **8097641616** {NC251781}

**Required Teacher For**
**Jawed Urdu High School**
Akbar Lala Compound Azad Nagar, Ghatkoper (w) Mumbai - 400086

**Details are as under :**

| | |
|---|---|
| Group | Std 6 to 8 |
| Name of the post | Assistant teacher (shikshan sevak) |
| No. of Post | 01 |
| Education Qualification | B.A D.Ed/ B.Ed |
| Subject | English/Urdu/ social study, CTET /TET (Paper-2) |
| Remune-ration | Rs.18000/-pm |
| Type of Grant | Full Time 100% Aided |

Age Limit & Scale: As per Govt. Rule. Post sanction as per staffing pattern contact to the secretary personally for interview along with application biodata & testimonials

**On Saturday Dated 09.08.2025 At 3.30 Pm to 5.30 Pm**

REQ Female for our Godown at Rabale, Navi Mumbai. B.Sc. passed (with Chemistry) having Min Exp of 2 yrs in the said Field. Residing from Badlapur to CSMT & Digha to Panvel pref. Walk-in: Matangi, Thane (W) - Mob. **7400181025,** Email: sales@matangioffice.com {NC251789}

## Situation Vacant

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

Required Delivery Boy in Kandivali West. Attractive Salary Contact: **7506725068/ 9869340709** {NC251833}

Required computer operator, Accountant, Peon, male, female, retired person, students **9167683051.** {NC251817}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251417}

## नर्सिंग कोर्स

गव्हर्नमेंट मान्यता, 10वी/12वी पास नापास मुले-मुलींसाठी पेशंटकेअर / डिप्लोमा पेशंट केअर/मेडिकल लॅबोरेटरी / DMLT/X-RAY टेक्निशियन / ऑपरेशन थिएटर / Physiotherapy कोर्स करिता संपर्क : Dr. SHRIVASTAV :- **9769116609 / 9702029738** LMP Paramedical Institute. Borivali West {NC251485}

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251713}

## कर्जविषयक

आधारकार्ड आणि पॅनकार्डवर लोन मिळवा चार दिवसांत. संपर्कः **8450983443.** {NC251829}



# चिंता चिनी 'वॉटरबॉम्ब'ची

चीनने ब्रम्हपुत्रा नदीवर म्हणजेच त्यांच्या भाषेत 'यारलुंग झांगबो'वर जगातील सर्वात मोठ्या जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीला सुरुवात केली आहे. हे धरण तिबेटच्या पठारावर, भारताच्या सीमेपासून फार दूर नसलेल्या भागात उभारले जात आहे. याच्या संपूर्ण बांधकामाचा अंदाजे खर्च १७० अब्ज डॉलर्स इतका असून, ते पूर्ण होण्याची शक्यता २०३० च्या दशकात दर्शवली जात आहे.२०२३ सालच्या एका अहवालानुसार, जलविद्युत प्रकल्पामधून दरवर्षी ३०० अब्ज किलोवॅट-तासांपेक्षा अधिक वीज उत्पादन होण्याची अपेक्षा आहे. ही वीज ३० कोटींपेक्षा जास्त लोकांच्या वार्षिक गरजांसाठी पुरेशी आहे. हा वीजपुरवठा प्रामुख्याने बाह्य वापरासाठी केला जाणार आहे, तसेच तिबेट (ज्याला चीन अधिकृतपणे शिजांग म्हणतो) या भागातील स्थानिक मागणीही पूर्ण केली जाईल. या धरणातून निर्माण होणारी वीज ब्रिटनने मागील वर्षभरात एकूण वापरलेल्या विजेइतकी आहे.

भारत आणि चीन यांनी सीमा ओलांडणाऱ्या नद्यांशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी २००६ साली एक तज्ज्ञांची यंत्रणा स्थापना केली होती. या यंत्रणेअंतर्गत चीन पुराच्या हंगामात भारताला ब्रह्मपुत्रा नदी आणि सतलुज नदीसंबंधी जलसंपत्तीविषयक माहिती पुरवतो. मागील वर्षी, १८ डिसेंबर रोजी भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात झालेल्या चर्चेत सीमा ओलांडणाऱ्या नद्यांशी संबंधित माहितीच्या देवाण-घेवाणीचा मुद्दा चर्चेत आला होता. ब्रह्मपुत्रा नदीवरील धरण प्रकल्प अभियांत्रिकीच्या दृष्टिकोनातून मोठी आव्हाने निर्माण करणारा आहे. कारण हा प्रकल्प उभा राहात असलेल्या भागात टेक्टोनिक प्लेटस्ची सीमा आहे आणि तिथे वारंवार भूकंपही येतात. तिबेटी पठार, ज्याला 'जगाचे छप्पर' म्हटले जाते, हे टेक्टोनिक प्लेटस्वर स्थित असल्याने या भागात नेहमीच भूकंपाचा धोका असतो.



• ब्रिगेडियर हेमंत महाजन

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये अधिकृत निवेदनाद्वारे या भूकंपसंबंधी चिंता दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या निवेदनात असे सांगण्यात आले की हा जलविद्युत प्रकल्प सुरक्षित असून त्यामध्ये पर्यावरणीय संरक्षणाचाही योग्य विचार करण्यात आला आहे.

चीनच्या दाव्यानुसार, हे धरण तिबेट आणि चीनमधील ऊर्जा गरजा पूर्ण करणार असून, नदीच्या खालच्या प्रवाहावर फारसा परिणाम होणार नाही. पण भारत व बांगलादेश या दोन्ही देशांना चीनच्या दाव्याबाबत शंका आहे. कारण या धरणामुळे चीनला यारलुंग झांगबोच्या प्रवाहावर नियंत्रण मिळणार आहे. परिणामी, भारतातील अरुणाचल प्रदेश व आसाम, तसेच बांगलादेशमधील लाखो लोकसंख्येवर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारत सरकारने याविषयी चिंता व्यक्त केली असून, उत्तर-पूर्व भारतात अप्पर सियांग बहुउद्देशीय प्रकल्प हे स्वतःचेही धरण बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

अरुणाचल प्रदेशचे उपमुख्यमंत्री चौना मीन यांनी मार्च महिन्यात स्पष्ट सांगितले होते की, जर चीनने हे धरण पूर्ण करून नदीचे पाणी वळवले, तर सियांग नदी आणि तिच्या उपनद्यांचा प्रवाह कोरडा पडेल. याचा परिणाम केवळ पर्यावरणावर नव्हे, तर शेतकी, मासेमारी, पिण्याचे पाणी व जैवविविधतेवर होईल.

सियांग नदी हीच पुढे ब्रम्हपुत्रा नावाने ओळखली जाते. जर भारत-चीन यांच्यात भविष्यकाळात संघर्ष उद्भवला, तर चीन या धरणातून प्रचंड प्रमाणात पाणी सोडू शकतो. तसे झाल्यास अरुणाचल व आसाममध्ये अचानक पूर येऊ शकतो. यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी व मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**भारतासोबतच बांगलादेशसाठीही या धरणामुळे धोका निर्माण होणार आहे. हा सुपर-डॅम ब्रह्मपुत्रेच्या नैसर्गिक पुरचक्रात अडथळा आणणार असल्यामुळे मच्छीमारीला मिळणारा नैसर्गिक फायदा कमी होईल. हंगामी गाळ जर या भागांपर्यंत पोहोचला नाही तर आसाम आणि बांगलादेशातील पुरग्रस्त मैदाने त्यांच्या नैसर्गिक सुपीकतेपासून वंचित राहतील. चीनचा हा प्रकल्प अरुणाचल प्रदेशच्या भारतीय सीमेजवळ आहे. त्यामुळे भविष्यात चीन या धरणाचा वापर भारताविरुद्ध दबावाच्या किंवा शस्त्राच्या स्वरूपात करू शकतो. या धरणामुळे भारत आणि बांगलादेशमधील नाजूक पठारी व खालील भागातील परिसंस्थेला नुकसान पोहोचण्याची भीती आहे.**

भाजपचे खासदार तापीर गाव यांनी या धरणाला 'वॉटर बॉम्ब' असे संबोधले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, चीन केवळ ऊर्जा प्रकल्प नव्हे, तर पाण्याच्या माध्यमातून भारतावर दबाव आणण्याची रणनीती वापरत आहे. २००० साली चीनने अचानक पाणी सोडले, तेव्हा सियांग नदीवरील जवळपास सर्वच पूल वाहून गेले होते आणि पासीघाट विमानतळ ७ फूट पाण्याखाली गेला होता. अशा आपत्ती पुन्हा टाळण्यासाठी भारतालाही मोठ्या प्रमाणात उपाय करावे लागतील. तापीर गाव यांनी सुचवले की, भारतानेही एक विशाल धरण सियांग नदीवर उभारले पाहिजे, जे २५ मीटर उंच बफर झोन तयार करून, १५ किलोमीटरपर्यंतचा अतिरिक्त पाण्याचा प्रवाह साठवू शकेल. यामुळे आपत्ती व्यवस्थापन सहज शक्य होईल.

ब्रहमपुत्रा नदीबाबतचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, भारत या प्रवाहात 'डाऊनस्ट्रीम' म्हणजे खालच्या दिशेचा देश असला तरी संपूर्ण प्रवाहाच्या केवळ १४ टक्के पाणी चीनच्या तिबेट भागातून येते. उर्वरित ८६ टक्के पाणी भारतात, विशेषतः अरुणाचल व आसाममधील मोठ्या उपनद्यांमधून व मुसळधार पावसातून येते. हे पाणी रोखण्याबाबत चीनची पकड पूर्ण नाही. तथापि, पुराच्या काळात चीनने आपल्या धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले, तर अरुणाचल व आसाममध्ये भीषण जलआपत्ती निर्माण होऊ शकते. त्यामुळे चीन पाण्याचा प्रवाह पूर्ण रोखू शकत नसला, तरी 'हायड्रोलॉजिकल वेपन' म्हणजेच पाण्याचे शस्त्र म्हणून त्याचा वापर करून अचानक पूर आणणे हे नक्कीच शक्य आहे. हा धोका केवळ पाण्याशी संबंधित अभियांत्रिक चुका, धरण व्यवस्थापनातील निर्णय वा हवामानातील अतिरेकी बदलामुळेही वाढू शकतो.

मुळात, भारत व चीनमध्ये सध्या कोणतेही अधिकृत जलवाटप करार अस्तित्वात नाहीत. २०१३ मध्ये दोन्ही देशांनी एक सामंजस्य करार केला होता, पण भारताचे म्हणणे आहे की चीन सतत पाण्याच्या वहनाची माहिती उशिरा व अपुरी देतो. हेही एक चिंता उत्पन्न करणारे कारण आहे. एकूणच, भारतासमोर हे आव्हान केवळ धरणाच्या उभारणीचे नाही, तर चीनच्या रणनीतीचे असून ती एकूणच दक्षिण आशियातील पाण्याच्या राजकारणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करते. भारताला या पार्श्वभूमीवर अधिक चतुराईने व धोरणात्मकदृष्ट्या मजबूत पावले उचलावी लागतील. त्यात वैज्ञानिक दृष्टीकोन, पूर व्यवस्थापन, सखोल संवाद धोरण आणि पायाभूत सुविधा यांचे योग्य मिश्रण आवश्यक आहे.

# आजचे राशी भविष्य

शनिवार दि.२ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | दळणवळण क्षेत्रातील काम करणाऱ्यांना अनुकूल परिस्थिती राहील. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. नोकरीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागेल. |
| वृषभ | नोकरीमध्ये वरिष्ठांशी मर्जी राखण्यात यश मिळेल. संततीच्या बाबतीत शुभ वार्ता समजतील. मालमत्ते संबंधित कागदपत्रांची पूर्तता होईल. |
| मिथुन | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. काहींना दूरदेशी जाण्याचे योग येतील. तरुण वर्गाला प्रेमात पूरक प्रतिसाद मिळेल. |
| कर्क | पर्यटन क्षेत्रातील व्यक्तींना अनुकूल वातावरण राहील. घरामध्ये धार्मिक वातावरण राहील. स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. |
| सिंह | कामाचा व्याप वाढणार आहे, नियोजन व्यवस्थित करावे लागेल. खर्चाचे प्रमाण वाढेल. स्वतःच्या बोलण्यावर जाणीवपूर्वक संयम ठेवावा लागेल. |
| कन्या | कार्यक्षेत्रात तुम्ही केलेल्या मेहनतीचे फळ मिळणार आहे. नोकरीमध्ये इतर लोकांशी समजूतीने वागावे लागेल. तरुण वर्ग मित्र परिवारात रमेल. |
| तूळ | आज भाग्याची साथ लाभणार आहे. तुमच्या समोरील अनेक अडचणी दूर होतील. नोकरीमध्ये तुमचा मान वाढेल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात काही आर्थिक अडचणी उद्भवू शकतात. घरातील वडीलधाऱ्या मंडळींची आरोग्याची काळजी वाटेल. नोकरीत अनुकूल वातावरण राहील. |
| धनु | हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण कराल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. जोडीदाराचे सहकार्य राहील. |
| मकर | कार्यक्षेत्रात तुमच्या कामाचे कौतुक होईल. मुलांच्या प्रगतीच्या दृष्टीने अनुकूल काळ. काहींना अचानक धनलाभाचे योग येतील. |
| कुंभ | स्वकर्तबगारीने कार्यक्षेत्रात नावलौकिक मिळवाल.सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. संततीची चिंता दूर होईल. |
| मीन | कार्यक्षेत्रात अनपेक्षित अडचणी येऊ शकतात. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल. |

# निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 31 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 01/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-08 : 9526**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- : 1544 (श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे), 4159 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), 5636, 6252, 8387

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0005 | 0316 | 3735 | 5247 | 5661 | 6183 | 6435 | 6491 | 7636 | 7999 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 500/- | 3025 | 6256 | 6286 | 6423 | 7176 | 7220 | 7472 | 7625 | 8716 | 9407 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0043 | 1206 | 2121 | 3160 | 3934 | 4884 | 5793 | 6916 | 7780 | 9009 |
| 0062 | 1249 | 2266 | 3240 | 3937 | 4964 | 5865 | 6941 | 7785 | 9248 |
| 0160 | 1406 | 2268 | 3243 | 4134 | 5129 | 6003 | 7064 | 8060 | 9262 |
| 0187 | 1414 | 2272 | 3289 | 4184 | 5151 | 6086 | 7089 | 8063 | 9269 |
| 0356 | 1501 | 2275 | 3296 | 4266 | 5349 | 6102 | 7127 | 8087 | 9338 |
| 0404 | 1694 | 2487 | 3302 | 4397 | 5362 | 6187 | 7419 | 8130 | 9380 |
| 0456 | 1712 | 2578 | 3307 | 4445 | 5455 | 6266 | 7427 | 8208 | 9422 |
| 0847 | 1724 | 2632 | 3391 | 4468 | 5529 | 6267 | 7507 | 8232 | 9439 |
| 0925 | 1762 | 2717 | 3539 | 4514 | 5540 | 6355 | 7537 | 8249 | 9506 |
| 0931 | 1801 | 2744 | 3723 | 4600 | 5545 | 6553 | 7566 | 8413 | 9539 |
| 1021 | 1928 | 2759 | 3726 | 4643 | 5553 | 6644 | 7702 | 8570 | 9755 |
| 1111 | 1991 | 2854 | 3735 | 4743 | 5572 | 6691 | 7746 | 8579 | 9837 |
| 1181 | 1993 | 2862 | 3743 | 4749 | 5630 | 6776 | 7762 | 8790 | 9946 |
| 1201 | 2026 | 2882 | 3806 | 4833 | 5670 | 6895 | 7770 | 8884 | 9976 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# निकाल — महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी • राजलक्ष्मी विकली लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 31 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 01/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SR-02 : 5412**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 2242 | 2301 | 3324 | 3795 | 3838 | 3920 | 4359 | 4564 | 4770 | 5829 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1053 | 1679 | 2649 | 2864 | 2900 | 3774 | 3812 | 4391 | 4434 | 5687 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1146 | 2293 | 3028 | 4188 | 4934 |
| 1147 | 2418 | 3035 | 4230 | 5010 |
| 1384 | 2433 | 3326 | 4271 | 5034 |
| 1388 | 2577 | 3413 | 4382 | 5051 |
| 1491 | 2677 | 3509 | 4412 | 5069 |
| 1661 | 2699 | 3621 | 4452 | 5152 |
| 1672 | 2717 | 3690 | 4453 | 5290 |
| 1731 | 2802 | 3790 | 4455 | 5335 |
| 1780 | 2848 | 3813 | 4727 | 5579 |
| 1801 | 2923 | 3843 | 4847 | 5836 |
| 2202 | 2937 | 3916 | 4907 | 5858 |
| 2255 | 3003 | 4070 | 4931 | 5891 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी दि. २/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ३ | ० | ५ |
| ३० | ०४ | ५४ |
| ३५ | ०९ | ५९ |
| १२० | १४५ | १५९ |
| ६७० | ४६० | २४९ |

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**






# महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 31 • सोडत दिनांक 01/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख : **VL-02 : 7711**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **5638** (कपिल लॉटरी - कोल्हापूर, प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण, रुखमणी एन्टरप्रायझेस - औरंगाबाद)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1249 | 2277 | 4703 | 5147 | 6203 | 7569 | 7756 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 3445 | 4572 | 4720 | 4878 | 5326 | 5614 | 6724 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2399 | 2401 | 4006 | 6269 | 6633 | 6921 | 7044 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 3751 | 4218 | 5174 | 5307 | 5811 | 5970 | 6014 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1912 | 2292 | 2890 | 3374 | 3847 | 4461 | 5015 | 5546 | 5975 | 6541 | 6986 | 7541 |
| | | 1913 | 2298 | 2893 | 3378 | 3853 | 4471 | 5040 | 5548 | 5980 | 6567 | 6987 | 7557 |
| | | 1916 | 2300 | 2900 | 3383 | 3854 | 4476 | 5044 | 5551 | 5988 | 6587 | 6996 | 7567 |
| 1001 | 1414 | 1928 | 2306 | 2906 | 3386 | 3888 | 4493 | 5052 | 5553 | 6014 | 6610 | 7007 | 7577 |
| 1010 | 1416 | 1936 | 2343 | 2908 | 3397 | 3895 | 4497 | 5066 | 5554 | 6046 | 6612 | 7035 | 7582 |
| 1012 | 1417 | 1956 | 2355 | 2923 | 3398 | 3903 | 4505 | 5079 | 5556 | 6055 | 6614 | 7040 | 7587 |
| 1014 | 1437 | 1970 | 2358 | 2925 | 3423 | 3933 | 4565 | 5092 | 5559 | 6062 | 6623 | 7052 | 7600 |
| 1031 | 1446 | 1991 | 2359 | 2928 | 3428 | 3934 | 4571 | 5107 | 5565 | 6066 | 6628 | 7068 | 7607 |
| 1037 | 1468 | 2024 | 2394 | 2955 | 3433 | 3935 | 4648 | 5125 | 5568 | 6069 | 6630 | 7075 | 7614 |
| 1041 | 1469 | 2025 | 2426 | 2956 | 3435 | 3944 | 4649 | 5137 | 5579 | 6075 | 6643 | 7078 | 7631 |
| 1063 | 1479 | 2027 | 2429 | 2982 | 3440 | 3966 | 4666 | 5150 | 5585 | 6087 | 6646 | 7097 | 7643 |
| 1098 | 1491 | 2028 | 2445 | 3005 | 3442 | 3975 | 4674 | 5151 | 5595 | 6093 | 6656 | 7125 | 7672 |
| 1106 | 1500 | 2049 | 2450 | 3019 | 3470 | 3986 | 4689 | 5155 | 5599 | 6099 | 6676 | 7134 | 7679 |
| 1109 | 1505 | 2052 | 2460 | 3033 | 3503 | 3993 | 4690 | 5161 | 5609 | 6163 | 6680 | 7216 | 7700 |
| 1114 | 1511 | 2081 | 2500 | 3046 | 3507 | 4011 | 4714 | 5180 | 5643 | 6164 | 6684 | 7223 | 7705 |
| 1116 | 1569 | 2088 | 2512 | 3050 | 3531 | 4019 | 4779 | 5201 | 5675 | 6169 | 6685 | 7225 | 7709 |
| 1134 | 1574 | 2095 | 2515 | 3054 | 3541 | 4049 | 4783 | 5233 | 5722 | 6221 | 6686 | 7238 | 7715 |
| 1149 | 1581 | 2102 | 2519 | 3074 | 3553 | 4051 | 4785 | 5235 | 5752 | 6225 | 6694 | 7268 | 7722 |
| 1171 | 1614 | 2108 | 2525 | 3092 | 3568 | 4061 | 4801 | 5237 | 5753 | 6228 | 6697 | 7324 | 7757 |
| 1172 | 1622 | 2120 | 2527 | 3095 | 3582 | 4062 | 4803 | 5241 | 5754 | 6234 | 6746 | 7330 | 7770 |
| 1199 | 1662 | 2121 | 2542 | 3135 | 3583 | 4083 | 4806 | 5259 | 5771 | 6248 | 6749 | 7340 | 7787 |
| 1207 | 1714 | 2152 | 2549 | 3147 | 3592 | 4092 | 4809 | 5262 | 5813 | 6266 | 6752 | 7350 | 7788 |
| 1229 | 1721 | 2189 | 2569 | 3157 | 3597 | 4121 | 4819 | 5280 | 5817 | 6267 | 6757 | 7357 | 7794 |
| 1241 | 1742 | 2197 | 2575 | 3190 | 3609 | 4144 | 4845 | 5297 | 5821 | 6275 | 6766 | 7375 | 7795 |
| 1255 | 1761 | 2217 | 2632 | 3193 | 3633 | 4200 | 4846 | 5298 | 5831 | 6352 | 6767 | 7378 | 7818 |
| 1261 | 1775 | 2220 | 2645 | 3196 | 3637 | 4245 | 4847 | 5322 | 5851 | 6353 | 6780 | 7387 | 7851 |
| 1285 | 1791 | 2227 | 2692 | 3222 | 3653 | 4246 | 4848 | 5389 | 5888 | 6362 | 6787 | 7390 | 7872 |
| 1312 | 1793 | 2230 | 2695 | 3229 | 3661 | 4264 | 4849 | 5398 | 5895 | 6366 | 6792 | 7393 | 7875 |
| 1313 | 1811 | 2231 | 2711 | 3235 | 3662 | 4274 | 4852 | 5399 | 5896 | 6385 | 6833 | 7408 | 7878 |
| 1321 | 1825 | 2245 | 2717 | 3240 | 3703 | 4324 | 4858 | 5440 | 5900 | 6386 | 6844 | 7417 | 7886 |
| 1331 | 1843 | 2250 | 2723 | 3310 | 3739 | 4334 | 4894 | 5451 | 5913 | 6391 | 6846 | 7435 | 7890 |
| 1339 | 1860 | 2264 | 2748 | 3321 | 3773 | 4340 | 4899 | 5494 | 5919 | 6399 | 6866 | 7450 | 7917 |
| 1341 | 1861 | 2266 | 2756 | 3339 | 3785 | 4344 | 4900 | 5506 | 5925 | 6401 | 6867 | 7456 | 7940 |
| 1371 | 1868 | 2269 | 2759 | 3346 | 3789 | 4410 | 4908 | 5508 | 5933 | 6408 | 6896 | 7471 | 7942 |
| 1385 | 1869 | 2271 | 2802 | 3351 | 3793 | 4411 | 4949 | 5509 | 5940 | 6458 | 6900 | 7485 | 7957 |
| 1391 | 1872 | 2274 | 2803 | 3355 | 3829 | 4416 | 4969 | 5510 | 5944 | 6476 | 6911 | 7488 | 7962 |
| 1399 | 1884 | 2277 | 2824 | 3366 | 3831 | 4424 | 4984 | 5536 | 5955 | 6479 | 6956 | 7513 | 7964 |
| 1410 | 1887 | 2280 | 2853 | 3369 | 3836 | 4446 | 5004 | 5537 | 5970 | 6510 | 6960 | 7537 | 7990 |
| 1413 | 1901 | 2288 | 2882 | 3373 | 3840 | 4460 | 5005 | 5540 | 5971 | 6516 | 6964 | 7539 | 7996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 31 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 01/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-01 : 6687**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0911 | 2016 | 2332 | 3272 | 3729 | 3971 | 5021 | 8678 | 9116 | 9624 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0472 | 0782 | 2486 | 2789 | 3260 | 4468 | 5134 | 6759 | 6912 | 9952 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1016 | 1205 | 1271 | 2252 | 3153 | 3349 | 4787 | 6359 | 6832 | 9239 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 0630 | 1557 | 2458 | 3463 | 4184 | 5176 | 6269 | 7370 | 8230 | 9192 |
| 0009 | 0636 | 1591 | 2571 | 3464 | 4190 | 5263 | 6286 | 7378 | 8238 | 9193 |
| 0054 | 0656 | 1631 | 2602 | 3544 | 4309 | 5268 | 6314 | 7427 | 8283 | 9215 |
| 0072 | 0660 | 1666 | 2612 | 3589 | 4393 | 5422 | 6320 | 7576 | 8291 | 9249 |
| 0087 | 0682 | 1825 | 2673 | 3594 | 4398 | 5451 | 6347 | 7631 | 8305 | 9279 |
| 0091 | 0703 | 1859 | 2693 | 3610 | 4419 | 5457 | 6365 | 7693 | 8410 | 9289 |
| 0092 | 0805 | 1898 | 2701 | 3629 | 4441 | 5465 | 6466 | 7721 | 8459 | 9291 |
| 0149 | 0996 | 1942 | 2835 | 3658 | 4450 | 5517 | 6509 | 7745 | 8482 | 9306 |
| 0278 | 1048 | 2009 | 2873 | 3687 | 4469 | 5671 | 6574 | 7758 | 8576 | 9327 |
| 0303 | 1078 | 2027 | 2924 | 3706 | 4521 | 5708 | 6596 | 7761 | 8648 | 9550 |
| 0304 | 1092 | 2037 | 2939 | 3720 | 4539 | 5899 | 6627 | 7775 | 8686 | 9570 |
| 0306 | 1112 | 2211 | 2979 | 3730 | 4545 | 6010 | 6639 | 7776 | 8710 | 9589 |
| 0327 | 1159 | 2215 | 3061 | 3738 | 4608 | 6016 | 6642 | 7785 | 8781 | 9599 |
| 0374 | 1163 | 2227 | 3132 | 3774 | 4744 | 6027 | 6703 | 7793 | 8784 | 9770 |
| 0401 | 1208 | 2231 | 3176 | 3794 | 4841 | 6065 | 6830 | 7837 | 8798 | 9825 |
| 0427 | 1331 | 2235 | 3183 | 3798 | 4854 | 6146 | 6923 | 7976 | 8826 | 9857 |
| 0444 | 1371 | 2265 | 3267 | 3994 | 4874 | 6165 | 6954 | 7983 | 8868 | 9859 |
| 0492 | 1401 | 2314 | 3301 | 4043 | 4909 | 6202 | 6960 | 7987 | 8930 | 9906 |
| 0523 | 1481 | 2321 | 3312 | 4063 | 5049 | 6214 | 7019 | 8089 | 8986 | 9952 |
| 0550 | 1519 | 2362 | 3322 | 4122 | 5082 | 6240 | 7047 | 8104 | 9045 | 9972 |
| 0554 | 1556 | 2403 | 3387 | 4146 | 5095 | 6256 | 7167 | 8183 | 9116 | 9985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# तामिळनाडूत भाजपाला धक्का! पनीरसेल्वम 'एनडीए'तून बाहेर

■ चेन्नई

**तामिळनाडूचे** माजी मुख्यमंत्री आणि अभाअद्रमुक पक्षाचे नेते ओ. पनीरसेल्वम यांनी भाजपाच्या नेतृत्वाखालील 'एनडीए'तून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला आहे.त्यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते पी.एस. रामचंद्रन यांनी या निर्णयाची घोषणा केली.मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्यासोबत मॉर्निंग वॉक केल्यानंतर काही तासांतच त्यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. पनीरसेल्वम यांनी या



निर्णयानंतर म्हटले की, एनडीएतून बाहेर पडण्याचा निर्णय का घेण्यात आला ते सर्वांनाच माहिती आहे.

याबाबत अधिक भाष्य करण्याची गरज नाही. पनीरसेल्वम हे आता लवकरच राज्याच्या काही भागांचा दौरा करणार असून भविष्यात कोणाशी आघाडी करावयाची याचा निर्णय राजकीय स्थितीनुसार घेतला जाईल. पनीरसेल्वम यांनी पंतप्रधानांच्या भेटीसाठी वेळ मागितली होती. मात्र, त्यांना भेटीची परवानगी नाकारली होती. या नकारानंतर त्यांनी सर्व शिक्षा अभियान निधी वितरित करण्यात झालेल्या विलंबाबद्दल सोशल मीडियावर केंद्र सरकारवर जाहीर टीका केली.या घडामोडीनंतर त्यांनी भाजपाला धक्का देत एनडीएतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

देश विदेश

# लंडनमधील हॉस्पिटलजवळ डबल डेकर बसला आग

■ लंडन



**मध्य** लंडनमधील ग्रेट पोर्टलँड स्ट्रीटवरील हॉस्पिटलजवळ डबल डेकर बसला आग लागल्याने एकच गोंधळ उडाला. प्रवाशांना बसमधून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि या घटनेत सुदैवाने कोणतीही दुखापत झालेली नाही.

ग्रेट पोर्टलँड स्ट्रीट परिसरात सकाळी ६.५० वाजता ८८ क्रमांकाच्या बसच्या मागच्या बाजूला आग लागली.त्यामुळे पोलिसांनी रस्त्यावरील दोन्ही बाजूची वाहतूक बंद केली होती.या घटनेची माहिती मिळताच लंडन अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले.जवानांनी पाण्याचा मारा करत सकाळी ७ वाजता ही आग आटोक्यात आणली.ही आग नेमक्या कारणामुळे लागली हे मात्र उघड झाले नाही.

# कॅनडात परदेशी लोकांना पालकांसह राहता येणार

■ ओटावा

**कॅनेडियन** नागरिकत्व मिळालेले किंवा कायमस्वरुपी रहिवासी असलेल्या परदेशी नागरिकांसाठी एक नवीन योजना आणली असून या योजनेनुसार कॅनडाचे सरकार परदेशी नागरिकांना आपल्या पालकांना,आजी-आजोबांना त्यांच्यासोबत राहण्यासाठी बोलावण्याची संधी देणार आहे.याचा सर्वाधिक फायदा भारतीयांना होणार आहे.

परदेशी नागरिकांनी कॅनडाच्या आयआरसीसी अंतर्गत २०२० मध्ये अर्ज केले आहेत,अशा लोकांना सध्या या योजनेचा लाभ घेता येणार आहे. यामुळे आता कॅनडामध्ये आपल्या कुटुंबियांना बोलावण्याची संधी मिळणार आहे. कॅनडाने अर्जासाठी आमंत्रण पाठवण्यास सुरुवात केली आहे.

कॅनडाने १७ हजार ८६० आमंत्रणे पाठवली आहेत. परंतु यातील केवळ १० हजार अर्जच स्वीकारले जाणार आहे.आमंत्रण मिळाल्यावर तुमच्या पालक किंवा आजी-आजोबांना कॅनडाच्या पीआर पोर्टलवर अर्ज करता येईल.एका पेक्षा जास्त अर्ज असल्यास पोर्टवर प्रत्येकाला स्वत:चे खाते तयार करुन अर्ज करावा लागेल.अर्जदार पालक व आजी-आजोबांना स्पॉन्सर करु शकतो.

# ईडीची अंदमानला पहिली धाड काँग्रेसच्या माजी खासदारांवर कारवाई

■ पोर्ट ब्लेयर

**अंदमान** व निकोबार राज्य सहकारी बँकेतील कथित २०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी ईडीने विविध ठिकाणी धाडी मारल्या. अंदमान व निकोबार बेटावर ईडीने केलेली ही पहिलीच कारवाई आहे. काँग्रेसचे माजी खासदार व बँकेचे उपाध्यक्ष कुलदीप राय शर्मा यांच्या अंदमानमधील ९ तर कोलकात्यातील २ ठिकाणांवर धाडी मारल्या.

पोर्ट ब्लेयरमधील धाडींमध्ये या बँकेत झालेल्या गैरव्यवहारांशी संबंधित अनेक कागदपत्रे जप्त केल्याचे ईडीने म्हटले. अंदमान व निकोबारच्या आर्थिक गुन्हे शाखेने या संदर्भात गुन्हा नोंदवला होता. या बँकेत काही बोगस कंपन्या स्थापन करुन त्याद्वारे नियमबाह्य कर्ज व ओव्हरड्राफ्ट सेवा देण्यात आल्याचे तपासात आढळले आहे.

कुलदीप राय शर्मा यांच्याशी संबंधित या कंपन्या असून त्याचा लाभ त्यांना झाल्याचे ईडीला आढळले आहे. ईडीची ही कारवाई काँग्रेसच्या प्रमुख नेत्यावर करण्यात आल्यामुळे पुन्हा एकदा या कारवाईविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सर्वोच्च न्यायालयानेही एका सुनावणी दरम्यान ईडीच्या कारवायांवर कठोर ताशेरे ओढले होते.

# बंगळुरूमध्ये खंडणीसाठी अल्पवयीन मुलाची हत्या

■ बंगळुरू

**कर्नाटकातील** बंगळुरूमध्ये खंडणीसाठी निशित या १३ वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण करून हत्या करण्यात आली. बनरघट्टाजवळून त्या मुलाचे अपहरण करण्यात आले. बनरघट्टा येथील कागलीपूर रोडवर त्याचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळला. या ठिकाणापासून त्याचे घर अवघ्या आठ किलोमीटर अंतरावर आहे.

निशित हा अराकेरे येथील वैश्य बँक कॉलनीच्या शांतिनिकेतन ब्लॉकमध्ये राहणारा आणि क्राइस्ट स्कूलमधील आठवीचा विद्यार्थी होता. त्याचे वडील अच्युत जेसी हे बंगळुरूतील एका नामांकित महाविद्यालयात व्याख्याता असून, आई एका नामवंत आयटी कंपनीत कार्यरत आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली असून त्यापैकी एक आरोपी निशितच्या घराचा कारचालक असल्याचे उघड झाले आहे.

# माजी उपराष्ट्राध्यक्ष हॅरिस राजकीय संन्यास घेणार

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** माजी उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांनी राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिले आहेत. एका मुलाखतीत त्यांनी म्हटले आहे की, सध्या अमेरिकेतील राजकीय व्यवस्था मोडीस आल्यामुळे आपण हा निर्णय घेत आहोत.

कमला हॅरिस म्हणाल्या की, सध्या अमेरिकेतील व्यवस्था मोडकळीस आली आहे. अर्थात अमेरिकन लोकशाहीची



मूलभूत मूल्ये इतकी मजबूत आहेत की ती येणाऱ्या आव्हानांचा सहज मुकाबला करू शकतील. मी अनेक वर्षे पदावर घालवली आहेत. त्यामुळे आता यापुढे कोणत्याही पदासाठी न लढण्याचे ठरवले आहे. अगदी कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदाच्या शर्यतीतही मी नाही. मी लोकांची सेवा करणे काही सोडणार नाही. मी माझे संपूर्ण जीवन लोकांच्या सेवेसाठी घालवले आहे. माझ्या कॅलिफोर्निया राज्यावर माझे प्रेम आहे. मी इथे ॲटर्नी जनरल व संसद सदस्य म्हणून काम केले आहे. आता मात्र मी कोणत्याही पदासाठी लढणार नाही.

# सरकारी विमा क्षेत्रातील कर्मचारी संघटनांचे महाधरणे आंदोलन

■ मुंबई

**एलआयसीप्रमाणे** समसमानता राखणारा वेतन करार मिळाला पाहिजे,अशा मागणीसाठी सरकारी विमा क्षेत्रातील जीआयईएआयए आणि जाइंट फोरमच्या बलाढ्य मित्र संघटनांनी दिल्लीच्या जंतरमंतरवर महाधरणे आंदोलन केले.या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी आपचे खासदार संजय सिंग आणि राज्यसभा खासदार कॉनरेड संदेश, काँग्रेस पक्षाचे माजी खासदार भिंटिया यांनी दिला. त्यासोबत एआयटीयुसीच्या महासचिव अमरजित कौर यांनी मार्गदर्शन करत या मागणीविषयी कर्मचाऱ्यांच्या बाजूने नक्की आवाज उठवू, असे जाहीर आश्वासन दिले. ३० जुलै रोजीच्या मुख्य कामगार आयुक्तालयात वित्तमंत्रालय, जिप्सा व्यवस्थापन आणि जाइंट फोरममध्ये झालेल्या समझोत्याची सुनावणी अपयशी ठरली असल्याने मुख्य कामगार आयुक्तांनी १९ ऑगस्ट रोजी तीनही पक्षांना पुन्हा एकदा सुधारित वेतन कराराच्या समाधानकारक वाटाघाटीसाठी प्रस्ताव घेऊन येण्याचे आदेश दिले.ज्याकडे हजारो कर्मचारी मोठ्या आशेने आणि विश्वासाने पाहत आहेत अशी माहिती जॉइंट फोरमच्या पश्चिमी क्षेत्राचे संपर्कप्रमुख जितेंद्र इंगळे यांनी दिली.

# २७ गावांतील कामगारांना १५ ऑगस्टला नियुक्तीपत्रे

■ कल्याण

**गेल्या** १० वर्षांपासून कल्याण-डोंबिवली महापालिकेत समाविष्ट केलेले २७ गावांतील कामगार पालिकेच्या सेवेत कार्यरत आहेत. तरीही या कामगारांना कायम सेवेत घेतले नव्हते.मात्र आता राज्य सरकारने याबाबतचे आदेश दिले असून प्रशासनाकडून कामगारांची पोलीस पडताळणी आणि आरोग्य तपासणी पूर्ण होताच या कामगारांना टप्प्याटप्प्याने नियुक्तीपत्र दिली जातील. पहिल्या टप्प्यातील नियुक्तीपत्रे १५ ऑगस्ट रोजी दिली जातील,असे आश्वासन पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिले.

ग्रामीण भागात दळणवळणाच्या सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत.या गावातून शाळेच्या वेळामध्ये बस सुविधा सुरू करण्याची मागणीही मान्य केली. कामगार आणि बस कमी असल्या तरीही काही प्रमाणात या मार्गावर बस चालविण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. ग्रामीण भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबरोबरच स्मार्ट सिटीमधील बंद असलेले कॅमेरे सुरु करावेत, गावामध्ये पथदिवे बसवावेत, बाळासाहेब ठाकरे दवाखाने आणि हेल्थ सेंटर सुरू करावे, सणाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावे, मंडपांसह कमानी शुल्कदेखील माफ करावे,ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचे प्रश्न तातडीने सोडवावे, अमृतच्या जलकुंभाचे काम पूर्ण करत या जलकुंभातून पाणीपुरवठा सुरु करावा, ग्रामीण भागातील भुयारी गटारांची कामे सुरू करावी,डोंबिवली स्थानक परिसरातील चिमणी गल्लीतील पार्किंग तातडीने सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. याबाबत तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.

# म्हापसात मध्यरात्री अपघात दोन तरुणांचा जागीच मृत्यू

■ म्हापसा

**उत्तर** गोवा जिल्ह्यातील बार्देश तालुक्यातील साळगाव येथे बुधवारी मध्यरात्री दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार टक्कर झाली. या भीषण अपघातात दोन्ही दुचाकी चालक जागीच ठार झाले, तर पाठीमागे बसलेले दोघेजण जखमी झाले. जखमींमध्ये एका तरुणीचा समावेश आहे.

मोहम्मद फराज (३०) व ओमकार कारापुरकर (२५) अशी या अपघातातील मृत चालकांची नावे आहेत. तर जखमींमध्ये फराजची बहीण जुबीन सुल्ताना व दुसऱ्या दुचाकीवरील दिपेश पेडणेकर यांचा समावेश आहे. ते गंभीर जखमी झाले आहेत. फराज आणि जुबीन हे पर्रा येथून साळगावच्या दिशेने जात असता ओमकार आणि दीपेश हे दोघे साळगाव येथून पर्राच्या दिशेने जात होते. साळगाव येथील रस्त्यावर आल्यानंतर दोन्ही दुचाकींत समोरासमोर धडक बसली. यात फराज आणि ओमकार हे दोघे जागीच ठार झाले. या अपघातातील दोघा जखमींवर गोमेकॉत उपचार सुरू आहेत. हा अपघात साळगाव-पर्रा रस्त्यावर साधारण रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास घडला.

# बुलडाण्यात शिंदेंच्या शेकडो कार्यकर्त्यांचा ठाकरे गटात प्रवेश

■ बुलडाणा

**स्थानिक** स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांमध्ये फेरबदल होत आहेत. बुलडाण्यातील मेहकरमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदेंना राम राम करत ठाकरे गटात प्रवेश केला आहे. यावेळी डरो मत. येणारा काळ उद्धव सेनेचा असेल!, असा विश्वास (ठाकरे गट) आमदार सिद्धार्थ खरात यांनी कार्यकर्त्यांना दिला.

बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर विधानसभा मतदारसंघ हा कायमच शिवसेनेसोबत राहिला आहे. शिवसेनेचे दोन गट पडल्यानंतरही या मतदारसंघात शिवसेनेचे (ठाकरे गट) उमेदवार सिद्धार्थ खरात हे प्रचंड मतांनी निवडून आले होते. आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठीदेखील खरात मैदानात उतरले आहेत. याच पार्श्वभूमीवर खरात यांच्यावर विश्वास ठेवत शिंदे गटात गेलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनी खरात यांच्या नेतृत्वात पुन्हा ठाकरे गटात प्रवेश केला.

# राजस्थानात पावसाचा कहर! ६९ वर्षानंतर विक्रमी पाऊस

■ जयपूर

**राजस्थानात** जुलै महिन्यात जोरदार पाऊस झाला असून ६९ वर्षांपूर्वीही असाच विक्रमी पाऊस झाल्याचे हवामान तज्ज्ञांनी म्हटले आहे. राजस्थानात या महिन्यात तब्बल २८५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे अनेक भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे.

राजस्थानात या आधी १९५६ साली जून महिन्यात सर्वाधिक ३०८ मिलीमीटर पाऊस झाला होता. त्यानंतर जुलै महिन्यात सरासरी १६१.४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. यावर्षी राजस्थान व उत्तर प्रदेशच्या वर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे जयपूर, शेखावाटी, विकानेरसह अजमेर, कोटा, भरतपूर, चुरु, तारानगर आदी भागात जोरदार पाऊस झाला. धौलपूर, सीकर व रामगढ मध्येही सरासरी १५० मिलीमीटर पाऊस



झाला. या पावसामुळे राजस्थानातील नद्यानाल्यांना पूर आले असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. पावसाने शहरांमधील जनजीवनही विस्कळीत झाले. विविध शहरांना जोडणारे व ग्रामीण भागातील अनेक रस्ते पाण्याखाली गेल्यामुळे वाहतूकही ठप्प झाली. उदयपूर, भरतपूर, सवाई माधोपूर, टोंक जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसामुळे पाणी भरले. धौलपूरमध्ये चंबळ नदी धोक्याच्या पातळीच्या १२ मीटर उंचीवरुन वाहात होती. त्यानंतर अनेक गावांमध्ये पाणी भरल्याने बचावासाठी लष्कराला पाचारण करावे लागले. झुंझुनू बायपासवर एक रस्ता धसल्यामुळे ग्रामस्थांनी कामाच्या दर्जाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. केकडी भागातील देवगाव मार्गावर दलदल निर्माण झाली असून त्यात अनेक वाहने अडकली. राजस्थानातील काही भागात २ तर काही भागात ६ ऑगस्टपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

# मुंबई विमानतळावर ८ कोटींचा गांजा जप्त

**४ आरोपींना अटक**

■ मुंबई

**मुंबईतील** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क (कस्टम) विभागाच्या अधिकाऱ्यांनी ८ कोटी रुपयांचा गांजा जप्त केला. ही कारवाई दोन दिवस करण्यात आली. यात ४ आरोपींना अटक करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या विमानात तीन संशयास्पद प्रवाशांना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी थांबवले होते. त्यांच्या सामानाची झडती घेतली असता, १.९९० किलो गांजा आढळला. त्याची किंमत बाजारात सुमारे २ कोटी रुपये आहे. मुंबई विमानतळावर आज ही बँकॉकहून विमान आले होते. यातील एका प्रवाशाकडून ६.२२ किलो गांजा जप्त करण्यात आला. याची बाजार किंमत ६ कोटी रुपये आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, आरोपींनी हे गांजाचे पाकीट काळ्या आणि पारदर्शक व्हॅक्यूम पाकिटामध्ये टाकून ते ट्रॉली बॅगमध्ये लपवले होते.

# नायर वैद्यकीय महाविद्यालयाचे कॅन्टीन बंद

■ मुंबई

**विद्यार्थ्यांची गैरसोय**

**नायर** वैद्यकीय कॉलेज आणि रुग्णालयाच्या वसतिगृहातील कॅन्टीन गेल्या दोन महिन्यांपासून बंद आहे.त्यामुळे या रुग्णालयातील सुमारे ४५० वैद्यकीय विद्यार्थ्यांना जेवणाच्या अडचणी येत आहेत. सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणापर्यंत सवलतीच्या दरात येथे जेवण मिळत होते. मात्र गेल्या दोन महिन्यांपासून कॅन्टीन बंद असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे.

रुग्णालय प्रशासनाने आवारातील दुसऱ्या कॅन्टीनमधून जेवणाची व्यवस्था केली असली तरी विद्यार्थ्यांनी याठिकाणी मिळत असलेल्या जेवणाच्या गुणवत्तेबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. हे कॅन्टीन पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न करूनही कोणतीही पूर्वसूचना न देता पुन्हा बंद करण्यात आले.

रुग्णालय प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, वसतिगृह कॅन्टीन चालवणाऱ्या कंत्राटदाराकडे आवश्यक परवाना नव्हता आणि कराराच्या अटींचे उल्लंघन करून त्याने भाडे भरण्यासही कसूर केली होती. कॅन्टीनच्या कामकाजात अनेक अनियमितता आढळून आल्या. त्यामुळे कॅन्टीनची सेवा थांबविण्यात आली आहे. आता नवीन पुरवठादार निवडण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

# खड्ड्यामुळे दुचाकी घसरली ६१ वर्षांच्या वृद्धाचा मृत्यू

■ पुणे

**पुण्यातील** औंध परिसरातील रस्त्यावरील खड्ड्यामुळे एका ६१ वर्षांच्या वृद्धाचा मृत्यू झाला. जगन्नाथ काशिनाथ काळे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते औंधमधील राहुल हॉटेलसमोरच्या रस्त्यावरून आपल्या दुचाकीने जाताना तेथील खड्ड्यामुळे त्यांची दुचाकी घसरली आणि मागून आलेल्या चारचाकीने त्यांना चिरडले.

ही घटना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. याचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या व्हिडिओवर पुणेकर संताप व्यक्त करत असून या मृत्यूला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित करत आहेत.

# जावळीतील वेळे गावाचे खंडाळ्यात पुनर्वसन

■ सातारा

**कोयना** अभयारण्यामुळे बाधित झालेले जावळी तालुक्यातील वेळे गाव अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत होते.मात्र आता वेळेकरांची ही प्रतीक्षा संपुष्टात येणार आहे.

कारण जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी वेळे गावाचे खंडाळा तालुक्यात पुनर्वसन करण्याचे काम पूर्ण केले या गावातील ६१ कुटुंबांना खंडाळा तालुक्यात निवारा व शेतजमीन उपलब्ध करत वेळे गावच्या पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागला आहे. १९८५ साली कोयना अभयारण्याची घोषणा झाली आणि त्यातूनच पुढे चांदोली राष्ट्रीय उद्यान आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्प उभा राहिला.परंतु या प्रकल्पासाठी पुनर्वसन करावे लागणारे वेळे हे एक गाव मात्र शासनाकडून दुर्लक्षितच



राहिले. जावळी तालुक्यातील अतिदुर्गम, डोंगराळ भागात वसलेले हे गाव अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहे. आजही या गावाला रस्ता नाही.ग्रामस्थांना पावसाळ्यात डोंगर उतारांवरून निसरड्या पायवाटांवरूनच जावे लागते.शाळा नाही, रस्ते नाहीत, आरोग्य सुविधा नाहीत, मुले गाव सोडून बाहेर तर वृद्ध लोक जंगली श्वापदांच्या भीतीच्या छायेखाली राहत आहेत.हे वास्तव प्रत्यक्ष पाहून जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी वेळे गावचे पुनर्वसन मार्गी लावण्याचा निर्णय घेतला.त्यासाठी त्यांनी या गावात जाऊन तेथील लोकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी मनोहर गव्हाड यांच्यासह काही मोजके अधिकारी होते.

# मडगाव रेल्वे स्थानकावर परप्रांतीय कामगारांची चौकशी

■ मडगाव

**गोव्यातील** मासेमारी हंगाम आजपासून सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर येथील रेल्वे स्थानकावर परराज्यातून विविध कामांसाठी येणाऱ्या परप्रांतीय कामगारांची संख्या वाढली आहे. त्यामुळे आता




कोकण रेल्वे पोलिसांकडून कामगारांच्या चौकशी मोहीम सुरू केली आहे. काल दिवसभरात तर १६० कामगारांची चौकशी करण्यात आली.

दक्षिण गोवा पोलिसांनी कुटबण जेटीवर येणाऱ्या परप्रांतीय कामगारांची नोंद राखण्यासाठी पडताळणी व चौकशी सुरू केली आहे. मडगाव रेल्वे स्थानकावर बाहेरून रेल्वे गाडी आल्यानंतर येणाऱ्या परप्रांतीय कामगारांकडून त्यांची ओळखपत्रे व इतर कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे.

मंगळवारी रात्रीपासून ही तपासणी सुरू झाली असून आतापर्यंत १६० कामगारांची चौकशी केली आहे. ही तपासणी यापुढेही सुरुच राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# पावसाने विश्रांती घेतल्याने कोयनेचे दरवाजे दोन फुटांवर

■ कराड

**गेल्या** काही दिवसांपासून कोयना धरणांतर्गत येणाऱ्या सर्वच पाणलोट क्षेत्रात पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे या धरणाच्या सहा वक्री दरवाजातून होणारा विसर्ग कमी करण्यात आला आहे. हे दरवाजे चार फुटांवरून दोन फुटांवर करण्यात आले आहेत. तरीही धरणात १९,५६८ क्युसेक्स पाण्याची आवक होत असून धरणातील पाणीसाठा ८६.०४ टीएमसी झाला आहे.

सध्या या धरणाच्या दरवाजातून विनावापर १०,५७१ व पायथा वीजगृहातून वीजनिर्मिती करून २,१०० असे एकूण १२,६७१ क्युसेक पाणी पूर्वेकडे कोयना नदीपात्रात सोडण्यात आले आहे. या धरणाचा विसर्ग कमी केल्याने पाटण, कराडसह शेजारील सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पुराचा धोका कमी झाला आहे.

# शिंदे दिल्लीहून परतताच मध्यरात्री शिवसेनेत पक्षप्रवेश

■ ठाणे

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौऱ्यावरून परतताच विरोधी पक्षांना मोठा झटका दिला आहे. काल रात्री आणि आज सकाळी यवतमाळ



येथील उबाठा आणि काँग्रेस पक्षातील अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. एकनाथ शिंदे आणि मंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

एकनाथ शिंदे काल संध्याकाळी दिल्लीहून मुंबईत परतले. शिंदे दिल्ली दौऱ्यावर असतानादेखील यवतमाळमधील पदाधिकारी, कार्यकर्ते पक्ष प्रवेशासाठी ठाण्यात एक दिवस मुक्कामी राहिले होते. याबाबत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. आज सकाळी नेर नगरपालिकेचे उबाठाचे माजी नगराध्यक्ष पवन जयस्वाल, सुनीता जयस्वाल, वनिता मिसळे, नगरसेवक संदीप गायकवाड, दिलीप म्हस्के, साजिद शरिफ, नगरसेविका सरिता सुने, दर्शना इंगोले, अल्पसंख्याक आघाडी माजी जिल्हाध्यक्ष रिझवान खान, गणेश शीलकावार, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस लोकेश इंगोले, माजी जिल्हा परिषद सदस्य राकेश नेमनवार, पंचायत समिती उपसभापती संतोष बोडेवार, माजी सभापती अभय डोंगरे, विविध सहकारी संस्थेचे अध्यक्ष विलास ठाकरे, संचालक राहुल देहणकर, उबाठाचे महागाव शहर समन्वयक अविनाश देशमुख, भाजपा पदाधिकारी तेजस ठाकरे, उबाठाचे सवनाचे पदाधिकारी रुपेश ठाकरे, अमोल जाधव, शुभम राठोड, निलेश भारती या पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# रेल्वेच्या दर्जेदार सेवेचे काय?

जगातील सर्वात मोठे रेल्वेचे जाळे म्हणून भारताचा उल्लेख होत असतो. काही लाख किलोमीटर किंवा रेल्वे मार्ग रोज काही कोटी प्रवाशांची ने-आण करण्याबरोबरच कोट्यवधीचा माल वाहून नेण्याचे कामही रेल्वेकडून होत असते. सरकारच्या रेल्वे या एकमेव खात्यामध्ये तितकेच मोठे मनुष्यबळही काम करीत असते. ही रेल्वे जरी ब्रिटिश काळात सुरू झाली असली तरी तिचा खऱ्या अर्थाने विकास किंवा ती सामान्य माणसापर्यंत आणि अधिकाधिक गावांपर्यंत पोहोचवण्याचे काम स्वतंत्र भारतातच झाले. रेल्वेचा एकूण प्रचंड व्याप लक्षात घेऊनच स्वतंत्र रेल्वे अंदाजपत्रक सादर होत असे. परंतु स्वतंत्र अंदाजपत्रक सादर होऊनही रेल्वे मार्गांच्या विकासाचा वेग वाढत नव्हता. गेल्या दहा पंधरा वर्षांमध्ये हा वेग बऱ्याच प्रमाणात वाढला. आपण अनेक बाबतींबाबत जगाशी तुलना करीत असतो. त्या तुलनेमध्ये भारताच्या रेल्वेला विकासासाठी खूप मोठी झेप घ्यावी लागेल. त्याची आता आता कुठे सुरुवात झालेली आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जगातल्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात सुरक्षित आणि स्वस्थ सार्वजनिक परिवहन व्यवस्था म्हणून रेल्वेलाच लोकांकडूनही पसंती मिळाली आहे. अगदी काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत किंवा राजस्थानातील कोटापासून ते पश्चिम बंगालमधल्या कोलकातापर्यंत रेल्वे मार्गाचे प्रचंड जाळे भारतातल्या वेगवेगळ्या प्रांतांना जोडण्याचेच काम करते. भारतीय रेल्वे पूर्ण जागतिक दर्जाची होईल की नाही माहीत नाही. परंतु सामान्य माणसाला चांगल्या दर्जाचा प्रवास उपलब्ध करून द्यायचे काम रेल्वे मंत्रालयाने केले पाहिजे. यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये जवळपास दहा लाख कोटीपेक्षा जास्त रकमेची तरतूद रेल्वे विकासासाठी केली गेली. गेल्या पाच वर्षांत जवळपास पन्नास हजार किलोमीटरपेक्षा जास्त नवे रेल्वे मार्ग टाकले गेले. आतादेखील जवळपास अकरा हजार कोटींचे नवे प्रकल्प मंजूर केले गेले आहेत. ज्यामध्ये पर्यावरण स्नेही रेल्वे प्रवास असे उद्दिष्ट ठेवले असतानाच देशातल्या तेरा राज्यांमध्ये नव्याने ५७४ किलोमीटरचे नवे जाळे टाकले जाते आहे.

### बराच भाग दुर्लक्षित

वर्षानुवर्षे देशाचा असा विशिष्ट भाग होता की, ज्याकडे दुर्लक्ष झाले आहे. विशेषतः ईशान्य भारतात किंवा जम्मू काश्मिरमध्ये रेल्वे मार्ग टाकणे कठीण आहे असे समजून कोणतेही प्रयत्न झाले नव्हते. विशेषतः डोंगरदऱ्यात किंवा ग्रामीण भागाला रेल्वेने जोडण्याचे विशेष प्रयत्न केले गेले नव्हते. आता त्याला प्राधान्य दिले जाते आहे. जसे आसाममधील जलपायगुडी परिसरातील रेल्वे मार्गांचे चौपदरीकरण केले जाणार आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातल्या नागपूर, इटारसी दरम्यान चौथी मार्गिका टाकली जाईल. तर छत्रपती संभाजीनगर आणि परभणीदरम्यान रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण केले जाणार आहे. मराठवाड्यासारख्या औद्योगिकदृष्ट्या विकसित होत असलेल्या भागात चांगली रेल्वे सेवा असणे गरजेचे होते. अनेक वर्षांची मागणी लक्षात घेऊनच या मार्गाचे दुपदरीकरण केले जाते आहे. गेल्या काही वर्षात रेल्वे मंत्रालयाचा रेल्वे जाळे विस्तारण्याचा निर्धार निश्चितच दिलासादायक ठरतो. परंतु यासोबत सध्या असलेल्या रेल्वे प्रवासाचा दर्जा आणखी सुधारणे तितकेच महत्त्वाचे आहे. मुंबईसारख्या आर्थिक राजधानीतून देशाच्या सर्व भागांत रेल्वे जातात. परंतु सामान्य प्रवाशांसाठी विनावातानुकूलित ज्या गाड्या आहेत तिथल्या व्यवस्थांमध्ये अमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांमधली गैरव्यवस्था ही रेल्वेलादेखील मान खाली घालायला लावेल अशा प्रकारची असते. अनेक डब्यांमधली प्रचंड अस्वच्छता आणि वेळापत्रकांबाबतही होणारा गोंधळ प्रवाशांची कसोटी पाहणारा ठरतो. म्हणजे एकीकडे बुलेट ट्रेन सुरू करण्याचे आमिष दाखवले जाते आणि वेळेपेक्षा प्रचंड लेट धावणाऱ्या गाड्यांचे प्रमाणही वाढत असते. मुंबईसारख्या प्रचंड गर्दीच्या शहरातल्या उपनगरी सेवेचे परिपूर्ण नियोजन होऊ शकत नाही. किंबहुना उपनगरी गाड्यांमधील या गर्दीवर कोणताही बुलेट उपाय रेल्वे मंत्रालयाला शोधता आलेला नाही. खरे तर लालूप्रसाद यादव रेल्वे मंत्री असताना आहे त्याच रेल्वे मार्गांवर आणखी एक उन्नत रेल्वे मार्ग उभारण्याची कल्पना मांडली गेली होती. ज्यातून सकाळ संध्याकाळी होणाऱ्या गर्दीचे विकेंद्रीकरण होऊ शकले असते.

### महाराष्ट्राबाबत उदासीनता

महाराष्ट्राच्या बाबतीत अजूनही बऱ्याच सुधारणा आवश्यक ठरतात. देशातले प्रमुख जंक्शन म्हणून भुसावळ रेल्वे स्थानकाकडे पाहिले जाते. परंतु तिथली गैरव्यवस्था दुर्दैवीच म्हणावी लागते. नको त्या स्थानकांचे आधुनिकीकरण आणि सुशोभीकरण होते आहे. परंतु भुसावळच्याबाबतीत बरीच सापत्न वागणूक दिली जाते. नाशिक, पुणे, ही दोन महत्त्वाची महानगरे असून गेल्या दहा वर्षात घोषणा होऊनही एका किलोमीटरचाही रेल्वे मार्ग होऊ शकला नाही. नाशिक हे कुंभमेळ्याचे ठिकाण मानले जाते. परंतु नाशिकपासून दोनशे किलोमीटरवर असलेल्या गुजरात राज्याला जोडणारा एकही रेल्वे मार्ग टाकता आलेला नाही. नाशिकचे तीर्थक्षेत्र म्हणून असलेले महत्त्व आणि औद्यगिकरणासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांसाठी हा रेल्वे मार्ग आवश्यक ठरतो. अर्थात यासाठी राज्य सरकारने पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. त्या त्या भागातल्या खासदारांनी हे प्रश्न धसास लावले पाहिजेत. अर्थातच महाराष्ट्र सरकारने संपूर्ण राज्याचा अभ्यास करून कोणकोणत्या भागासाठी रेल्वे मार्गांची आवश्यकता आहे याचा कृतीआराखडा सादर केला पाहिजे. जागतिक आर्थिक केंद्र करण्याची घोषणा होते. पण त्याच महाराष्ट्रात रेल्वेसारख्या महत्वाच्या परिवहन सेवेबाबत उदासिनता दाखवली जाते. केवळ भरमसाठ वंदे भारत गाड्या सुरू करून लोकांना खुश करता येणार नाही. ज्या भागात रेल्वे पोहोचलेलीच नाही त्या भागातल्या लोकांना दिलासा मिळाला पाहिजे. म्हणूनच रेल्वेचे जाळे विस्तारत असताना ग्रामीण भागाचा विचार होणं आणि दर्जेदार सेवा मिळणं या दोन्ही गोष्टी दुर्लक्षित होता कामा नयेत.

**सुविचार**


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**मन दुखावल्यावर दाखविलेलं प्रेम आणि दुर्लक्ष केल्यावर दिलेलं महत्त्व याचा काही उपयोग नसतो..**

**पंचांग**

**शनिवार, २ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**





**श्रावण शुक्ल अष्टमी**
**नक्षत्र : विशाखा**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २३-५१ तूळ**
**२३-५२ ते २४-०० वृश्चिक**

**रवी उदय- ०६-१७**
**रवी अस्त- १९-१२**

**सूर्य आश्लेषा नक्षत्रात उत्तररात्री ४.०७; वाहन-गाढव; अश्वत्थमारूती पूजन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## चीज बॉल्स



★ **साहित्य :-**
२०० ग्रॅम चीज (किसलेले), १ कप ब्रेड क्रम्ब्स, १/२ कप मैदा, १/२ कप दूध, १/४ कप हिरवी मिरची (बारीक चिरलेली), १/४ कप कोथिंबीर (बारीक चिरलेली), चवीनुसार मीठ आणि काळी मिरी, तळण्यासाठी तेल.

★ **कृती :-**
एका भांड्यात चीज, हिरवी मिरची, कोथिंबीर, मीठ आणि काळी मिरी घाला. मिश्रण चांगले मिसळा आणि लहान गोळे बनवा. एका भांड्यात कोटिंगसाठी पीठ आणि दूध मिसळून द्रावण तयार करा. एका भांड्यात ब्रेड क्रम्ब्स घाला. चीज बॉल्स प्रथम पिठाच्या पिठात बुडवा, नंतर ब्रेड क्रम्ब्समध्ये कोट करा. तेल गरम करा आणि चीज बॉल्स सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा. चीज बॉल तयार आहे. तुमच्या आवडत्या डिपसह गरम सर्व्ह करा.



# मकाऊ ओपन सुपर बॅडमिंटन स्पर्धा लक्ष्य सेन आणि मन्नेपल्ली उपांत्य फेरीत

**भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि थरुन मन्नेपल्ली यांनी आपल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढती जिंकून मकाऊ ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उद्या दोन्ही उपांत्य फेऱ्या होणार आहेत. त्यात पहिल्या उपांत्य फेरीत मन्नेपल्ली मलेशियाच्या जे. होहशी आणि दुसऱ्यांमध्ये लक्ष्य सेन पाचव्या मानांकित इंडोनेशियाचा ए. फरहानशी भिडणार आहे.**




■ मकाऊ

**जगात** ४७ व्या क्रमांकावर असलेल्या २३ वर्षीय मन्नेपल्लीने आक्रमक खेळ करत ७५ मिनिटांच्या लढतीत चीनच्या ८७ व्या क्रमांकावर असलेल्या हू झेला २१-१२, १३-२१, २१-१८ असे पराभूत केले.राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेता लक्ष्यने एक तास आणि तीन मिनिटे चाललेल्या उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या झुआन चेन झूवर २१-१४,१८-२१,२१-१४ असा विजय मिळवला. मन्नेपल्लीचा हा या स्पर्धेत पहिलाच उपांत्य फेरीत प्रवेश आहे. फेब्रुवारीमध्ये जर्मन ओपनमध्ये तो उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला होता. सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या चुंग होन जियान आणि हैकल मुहम्मद यांच्याकडून १४-२१, २१-१३, २०-२२ असा पराभव पत्करावा लागला. ४ वर्षांपूर्वी पुलेला गोपीचंद अकादमीत सामील झालेल्या मन्नेपल्लीने दोन वर्षांपासून त्याची तंदुरुस्ती, चपळता आणि हालचाल सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले. या आठवड्यात त्याच्या कठोर परिश्रमाचे फळ मिळाले. कारण त्याने शेवटच्या आठ सामन्यांमध्ये अव्वल मानांकित हाँगकाँगच्या ली चेउक यिउलाही पराभूत केले.

## माजी क्रिकेटपटू प्रवीण भोईर ठाणे पालिकेतून सेवानिवृत्त

■ ठाणे

**माजी** क्रिकेटपटू आणि ठाणे महापालिकेच्या नौपाडा कोपरी प्रभाग समितीचे कार्यालयीन अधीक्षक प्रवीण भोईर निहित वयोमानानुसार पालिकेतून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रेमाचा निरोप दिला.

भरवशाचा मध्यमगती गोलंदाज अशी ओळख असलेल्या प्रवीण भोईर यांनी टाईम्स शिल्ड आणि ठाणे वैभव आंतर कार्यालयीन स्पर्धेत ठाणे महापालिकेचे प्रतिनिधित्व केले होते. तर क्लब क्रिकेटमध्ये भोईर यांनी शतकपूर्ती करणाऱ्या स्पोर्टिंग क्लब कमिटीचे प्रतिनिधित्व केले. राष्ट्रीय क्रिकेटपटू सुलक्षण कुलकर्णी यांचे सहाध्यायी असलेल्या प्रवीण भोईर आठ दशकांची परंपरा असलेल्या लोहार आळीच्या माघी गणेशोत्सवाच्या आयोजनात मोलाची भूमिका बजावतात, असे या उत्सवाचे अध्यक्ष सुरेश माशेरे यांनी सांगितले.

## फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी वानखेडेवर क्रिकेट खेळणार

■ मुंबई



**अर्जेंटिनाचा** दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी १४ वर्षांनंतर भारतात येणार आहे. तो १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत भारतात राहणार आहे आणि एकूण ३ ठिकाणांना भेट देणार आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मेस्सी सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासोबत क्रिकेट सामना खेळणार आहे.

या दौऱ्यात तो दिल्ली आणि कोलकातालाही भेट देईल. या दौऱ्यात मेस्सी कोलकाताला देखील जाईल आणि तेथे ईडर्न गार्डन्समध्ये त्याचा सन्मान देखील केला जाईल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकतात. कोलकाता भेटीदरम्यान लिओनेल मुलांसाठी फुटबॉल कार्यशाळेचे आयोजन देखील करेल आणि तो फुटबॉल क्लिनिक देखील सुरू करणार आहे.

## राज्य अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत ठाणे बॅडमिंटन अकादमी अव्वल

■ सातारा



**सातारा** येथे पार पडलेल्या योनेक्स सनराईस छत्रपती शिवाजीराजे भोसले स्मृती पहिल्या महाराष्ट्र राज्य सीनियर बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ठाणे बॅडमिंटन अकॅडमीच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत राज्य पातळीवर ठाण्याचे वर्चस्व ठसठशीतपणे सिद्ध केले. २ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्य अशा ७ पदकांची कमाई करत ठाण्याने सर्व वयोगटांत आपली खेळीमेळीची ताकद दाखवली.

या स्पर्धेत ते अनघा करंदीकरच्या दुहेरी विजयाने सर्वाधिक लक्ष वेधून घेतले. तिने महिला दुहेरीत सिया सिंगसोबत आणि मिश्र दुहेरीत अमन फारोघ संजयसोबत एकापाठोपाठ एक निर्णायक सामने जिंकत ‘दुहेरी मुकुट’ पटकावला. महिला दुहेरीच्या अंतिम सामन्यात अनघा-सिया जोडीने पुण्याच्या श्रुती मुंदडा आणि तनिष्का देशपांडे या गुणी जोडीला १७-२१,२१-१७, २१-१२ अशा तीन सेट्समध्ये हरवत सुवर्ण पटकावले.उपांत्य फेरीत त्यांनी ठाण्याच्याच अमन नौशाद आणि सोनाली मिरखेलकर या जोडीवर १६-२१, २१-१३, २१-१३ असा विजय मिळवला. मिश्र दुहेरी गटातही अनघा-अमन जोडीने जबरदस्त खेळ सादर करत सुवर्ण पटकावले. या गटात अमन नौशाद-सोनाली मिरखेलकर यांनी रौप्य पदक मिळवले तर सोहम फाटक-इशिता कोरगावकर जोडीने कांस्यपदकावर नाव कोरले. पुरुष एकेरीत अथर्व जोशीने झुंजार खेळ करत अंतिम फेरी गाठली. त्याने वरुण कपूरविरुद्ध अतिशय चुरशीच्या अंतिम सामन्यात १६-२१, २१-१५, १७-२१ अशी झुंज देत रौप्य पदक जिंकले. त्याचा डावखुरा खेळ, नेटवरील अचूकता आणि मानसिक समतोल विशेष कौतुकास्पद ठरले. पुरुष दुहेरीत कबीर कंझारकरने आपल्या जोडीदारासह सामन्यांमध्ये तगडे प्रदर्शन करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात त्यांनी २१-२३, २१-१८, ६-२१ अशा सेट्समध्ये झुंज दिली आणि रौप्य पदक मिळवले. याच गटात अर्जुन आणि आर्यन बिराजदार या भावंडांनी दमदार खेळ करत कांस्य पदक मिळवले.

## क्रिकेटपटू अभिमन्युच्या वडिलांचा निवड समितीला संतप्त सवाल

■ नवी दिल्ली

**भारतीय** क्रिकेट संघाचा युवा फलंदाज अभिमन्यु ईश्वरनला अजूनही कसोटी पदार्पणाची संधी मिळाली नाही. या सततच्या दुर्लक्षामुळे अभिमन्युचे वडीलही निराश झाले. त्यांनी आपली खंत व्यक्त करताना सांगितले की, मी अभिमन्युच्या कसोटी पदार्पणासाठी आता दिवस नाही, तर वर्षे मोजत आहे. ३ वर्षांपासून तो वाट पाहत आहे. खेळाडूचे काम आहे धावा करणे आणि अभिमन्युने ते करून दाखवले आहे.

ते पुढे म्हणाले की, काही लोक म्हणतात की, ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर भारतीय ‘अ’ संघाकडून खेळताना अभिमन्युने चांगली कामगिरी केली नाही. म्हणून त्याला संधी मिळाली नाही. ठीक आहे. मी हे मान्य करतो. पण बॉर्डर-गावस्कर मालिकेपूर्वी अभिमन्युने धावा केल्या. तेव्हा करुण नायर संघातही नव्हता. दुलीप करंडक आणि इराणी चषकासाठी करुणची निवडसुद्धा झाली नव्हती.

## परळमधील स्पोर्ट्स व रोहित अकादमीचे अविस्मरणीय यश

■ मुंबई



**नेरुळ** येथे प्रथमच तायक्वानडो अकादमीच्या वतीने झालेल्या हिरा तायक्वानडो चॅम्पियनशिप स्पर्धेत लालबाग-परळ येथील स्पोर्ट्स आणि रोहित अकादमीने मोठे यश मिळवले. कार्तिकी वाघरे, आर्या पाटील, नंदिनी पासी,आकांशा पासी, तेजस्विनी घोरपडे,वैष्णवी गाडे,सोहम कणसे, लवेश बेतकर यांनी सुवर्णपदक पटकाविले.सोनाक्षी मिश्रा,श्रद्धा मिश्रा,छवी जायस्वाल,काव्या लायगुडे,साक्षी कुर्मी,वेदांत पाटील,रोशनी गुप्ता,विजय गावंडलकर,तरुण कोटकल,नेत्रा सुतार,ग्रीष्मा घाडीगांवकर हे या स्पर्धेत रौप्यपदक विजेते आहे. त्यासोबत रिद्धी पाटील, रिया मिश्रा, आदित्य अमराले आणि अथर्व तायडे यांना कांस्य पदकावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत तेजस्विनी घोरपडे हिस ‘बेस्ट फाईटर’हा किताब देऊन गौरवण्यात आले.

## निवडणूक आयोगाने रिंकूचे ब्रँड ॲम्बेसेडर पद काढले प्रचारात्मक साहित्य काढून टाकण्याचे आदेश

■ नवी दिल्ली

**निवडणूक** आयोगाने क्रिकेटपटू रिंकू सिंगचे ब्रँड ॲम्बेसेडर पद काढून घेतले. या निर्णयामुळे त्याच्या चाहत्यांना धक्का बसला. मतदार जागरूकता मोहिमेत रिंकू सिंग सहभागी होता. आयोगाने त्यांच्याशी संबंधित सर्व प्रचारात्मक साहित्य काढून टाकण्याचे आदेश दिले. याबाबत जिल्हा प्रशासनाला पत्रही लिहिले. त्याचा साखरपुडा जौनपूरमधील मच्छली शहर येथील सपा खासदार प्रिया सरोज यांच्याशी झाला होता. हेच कारण सांगून निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला.

निवडणूक आयोगाने म्हटले की, रिंकूचे सपा खासदाराशी असलेले संबंध राजकीय पक्षपातीपणाला कारणीभूत ठरू शकतात.आता त्यांचे संबंध राजकीय पक्षाशी जोडलेले मानले जाऊ शकतात. म्हणून, पोस्टर, बॅनर, व्हिडिओ आणि डिजिटल जाहिरातींसारख्या सर्व साहित्यातून रिंकूचे फोटो आणि नाव काढून टाकावे. प्रत्येक सार्वजनिक प्रचारात निष्पक्षतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. रिंकू सिंग हा एक आदरणीय क्रिकेटपटू आहे. परंतु आता त्याचा एका सक्रिय राजकारणी व्यक्तीशी साखरपुडा झाला आहे. अशा परिस्थितीत त्याचे वैयक्तिक संबंध सार्वजनिक प्रचाराच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकतात. सोशल मीडियावर अनेकांनी याला ‘अति सावधगिरी’ म्हटले आहे. त्याचवेळी,




काहींचे म्हणणे आहे की, रिंकूच्या लोकप्रियतेचा गैरवापर होऊ नये. परंतु त्याला काढून टाकणे देखील योग्य पाऊल वाटत नाही. प्रिया आणि रिंकू यांचा साखरपुडा ८ जून रोजी लखनौमधील ‘द सेंट्रम’ हॉटेलमध्ये झाला. सपा प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव, डिंपल यादव, शिवपाल यादव, जया बच्चन आणि इतर २० खासदार लग्नाला उपस्थित होते.

# ज्येष्ठ कवयित्री रजनी परुळेकर



**सन १९७० नंतरच्या कवितेत रजनी परुळेकर यांनी महत्त्वाचे योगदान दिले. एम. ए.पर्यंत उच्च शिक्षण त्यांनी मुंबई विद्यापीठातून पूर्ण केले. मुंबईतल्या बुऱ्हाणी महाविद्यालयात त्यांनी मराठी अध्यापनाचे कार्य केले.**




रजनी परुळेकर या मराठी साहित्यातील महत्त्वाच्या कवयित्री होत्या. त्यांच्या कवितांचा कवयित्री नीरजा यांनी 'निद्राहीन रात्रीच्या कठोर कातळावर' हा संपादित केलेला काव्यसंग्रह हा अखेरचा काव्यसंग्रह ठरला.त्यांच्या विचारप्रवर्तक कवितांनी मराठी विश्वावर प्रभाव पाडला. दीर्घकविता, काही दीर्घ कविता, स्वीकार, चित्र, पुन्हा दीर्घकविता हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. पुरुषकेंद्री कवितेला छेद देणाऱ्या त्यांच्या कविता होत्या.१९७० च्या आधी कवयित्रींची अभिव्यक्ती आत्मकेंद्री आणि सौंदर्यवादी जाणिवांपुरती सीमित होती. परुळेकर यांनी या पलीकडे जात माणूस म्हणून कवितांमधून अभिव्यक्ती केली. त्यांच्या दीर्घकविता या कवितासंग्रहाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला होता. स्वीकार या संग्रहाला कवी कुसुमाग्रज आणि चित्र या संग्रहाला ना. धों. महानोर पुरस्कार मिळाला होता.

माणसामाणसांमधले संबंध हा परुळेकर यांच्या कवितांचा महत्त्वाचा विषय होता. त्यांनी मराठीतील अनेक नामांकित नियतकालिकांमधून लिहिले. हंसमध्ये त्यांच्या कविता प्रसिद्ध होत असत.कविता दशकाची या काव्यसंग्रहामध्ये त्यांच्या कवितांचा समावेश करण्यात आला होता. पैसा किंवा प्रसिद्धी मिळवण्यासाठी मी कविता लिहिल्या नसून जीवनातील अनुभव व्यक्त करण्यासाठी मी लिहिले असे त्या सांगायच्या.

जगण्याच्या अनेकविध अनुभवांना परुळेकर यांनी काव्यात्म रूप दिले. त्यांची कविता व्यक्तिनिष्ठतेची चौकट ओलांडून स्त्रीवादी व स्त्रीनिष्ठ झाली. आयुष्यात भेटलेल्या स्त्रिया त्यांच्या कवितेचा विषय होता. स्त्रीच्या भावजीवनाशी जोडलेल्या प्रतिमा हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य होते. उदाहरणार्थ 'हिरव्या चुडय़ांसारख्या लाटा', 'किलोभर सुरणासारखं कुबड.'त्यांचे दीर्घकविता (१९८५), काही दीर्घ कविता (१९९३), स्वीकार (१९९३), चित्र (१९९६), पुन्हा दीर्घकविता (१९९९), निद्राहीन रात्रीच्या कठोर काठावर (२०११) हे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत.परुळेकर यांच्या दीर्घ कवितासंग्रहाला राज्य पुरस्कार, 'स्वीकार' या संग्रहाला कवी कुसुमाग्रज पुरस्कार तसेच 'चित्र' या संग्रहाला ना. धों. महानोर पुरस्कार मिळाला होता.

कवितेच्या माध्यमातून व्यक्त होणारी कवयित्री अचानक व्यक्त व्हायची थांबली तरीही मराठी साहित्यसृष्टीने तिच्याकडे फारसे लक्ष दिले नाही.निवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य विपन्नावस्थेत गेले असे सांगण्यात येते. मुंबईमध्ये होणाऱ्या कवयित्री संमेलनामध्येही त्या अनेक वर्षे सहभागी झाल्या होत्या; मात्र नंतर त्या फारशा कुणाशी संपर्कात नव्हत्या. गिरगावातील रस्त्यांवरून विपन्नावस्थेत फिरताना त्या दिसायच्या. आयुष्याच्या संध्याकाळी त्यांच्या वाट्याला आलेले दुःख वेदनादायी होते.रजनी परुळेकर यांचे ६ मे २०२२ रोजी निधन झाले.




# अमेरिकेतील आयातशुल्क ७ ऑगस्टपासून अंमलबजावणी

■ वॉशिंग्टन

**भारतीय** वस्तूंवरील अमेरिकेतील आयातशुल्काची अंमलबजावणी येत्या ७ ऑगस्टपासून होणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या संदर्भात म्हटले आहे की, भारत आमचा मित्र आहे.मात्र भारताबरोबरच्या व्यापारात तोटा होत आहे. भारतातील आयातशुल्क जगातील सर्वाधिक आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ज्या ज्या देशांवर आयातशुल्क लागू केले त्या देशांची व त्यातील वस्तूंची यादी जारी केली. यावेळी ते म्हणाले की, भारतातील आयातशुल्क हे जगातील सर्वाधिक असल्याने गेल्या काही वर्षात चांगला व्यापार झालेला नाही. त्याचबरोबर या २५ टक्के आयातशुल्काखेरीज भारताने रशियाकडून लष्करी साहित्य खरेदी केल्याबद्दल त्यांच्यावर अतिरिक्त दंडही आकारण्यात येणार आहे. भारताबरोबरच्या व्यापारात अमेरिकेला मोठे नुकसान सहन करावे लागले आहे.

# सांगलीतील सर्व गावांमध्ये आता स्वयंचलित हवामान केंद्र

■ सांगली

**केंद्र** सरकारच्या निर्णयानुसार सांगली जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्र उभारले जाणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीच्या हद्दीत पाच बाय सात मीटर जागा शोधली जात आहे.यामुळे पावसाची मोजणी करून तसा अहवाल प्रत्येक दिवशी शासनाला पाठविला जाणार आहे,अशी माहिती जिल्हा कृषी अधिकारी विवेक कुंभार यांनी दिली.

विवेक कुंभार यांनी सांगितले की,सांगली जिल्ह्यात सध्या ६९६ ग्रामपंचायती असून, सध्या ६९ मंडलांच्या ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्रे आहेत. अनेकदा अवकाळी पाऊस हा काही गावांत पडतो,तर काही गावात पडतच नाही.तो मंडल गावात पडला नाही, तर किती पाऊस झाला, याची अचूक नोंद होत नाही.नुकसानीचा पंचनामा करताना अडचण येते.त्यामुळे प्रत्येक गावात असे केंद्र उभारण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे.

# कलंकित मंत्र्यांना जावेच लागेल खा. संजय राऊत यांनी सुनावले

■ मुंबई

**सरकार** मंत्र्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, सरकारने कितीही रंगसफेदी करण्याचा प्रयत्न केला तरी सरकारची प्रतिमा कलंकित झाली आहे. महाराष्ट्राला डाग लागला आहे. अशा प्रकारे मंत्रिमंडळातील पत्ते पिसल्यामुळे तो डाग पुसला जाणार नाही. त्यामुळे मंत्र्यांना जावेच लागेल, असे मी खात्रीने सांगत आहे, असे आज उबाठा खासदार संजय राऊत यांनी सुनावले.

राऊत पुढे म्हणाले की, वसईच्या आयुक्तांवर पडलेली धाड हे १००० कोटींचे प्रकरण आहे. त्यातदेखील एका मंत्र्याला जावे लागेल. तसेच आता जे नवीन क्रीडामंत्री आहेत, त्यांना योग्य खाते मिळाले आहे. मात्र ही तात्पुरती व्यवस्था आहे. प्रत्येक आरोपी शेवटपर्यंत स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न करतो. मात्र, कोकाटे यांच्यावर झालेली कारवाई ही केवळ थातूरमातूर आहे. वास्तविक आरोपी मंत्री आणि त्यांचे नेते आपापल्या माणसांना वाचवण्यासाठी धडपड करत आहेत. पण याचा जनतेच्या आणि विरोधकांच्या मतांवर काहीही परिणाम होणार नाही. सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर या सर्व प्रकरणाचे ओझे झाले आहे.

# व्यायाम करताना तरुणाचा मृत्यू

■ पिंपरी


**पिंपरी-चिंचवडमध्ये** व्यायामशाळेत व्यायाम करताना एका ३७ वर्षीय तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मिलिंद कुलकर्णी असे या तरुणाचे नाव आहे. त्याने ६ महिन्यांपूर्वी व्यायामशाळेत जाण्यास सुरुवात केली होती. आज सकाळी नेहमीप्रमाणे तो व्यायाम करण्यासाठी व्यायामशाळेत गेला होता. व्यायाम करून झाल्यानंतर मिलिंद खाली बसून पाणी प्यायला आणि काही सेकंदातच भोवळ येऊन खाली पडला. व्यायामशाळेतील त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला तत्काळ रुग्णालयात नेले. परंतु, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. मिलिंदची पत्नी डॉक्टर आहे.

# अमेरिकेच्या वादळाचा कहर! न्यूयॉर्क व न्यूजर्सीत आणीबाणी

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** पूर्व किनाऱ्यावर आलेल्या मुसळधार पावसामुळे न्यूयॉर्क, न्यूजर्सी, वॉशिंग्टन आणि फिलाडेल्फिया या प्रमुख शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली. न्यूयॉर्क आणि न्यूजर्सीत अधिकृतपणे आणीबाणी जाहीर करण्यात आली.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, काही भागांमध्ये केवळ एका तासात तब्बल ३ इंच (७.६ सेमी) पाऊस पडला. परिणामी नद्या तुडुंब भरून वाहू लागल्या. त्यामुळे रस्त्यांवर पाणी साचले. न्यूयॉर्कमधील सब-वे स्थानकांमध्ये पाणी शिरल्याने अनेक गाड्या थांबवण्यात आल्याने प्रवासी अडकले. बचाव पथकांनी त्यांना सुरक्षितस्थळी हलवले. न्यूयॉर्कच्या गव्हर्नर कॅथी होचुल यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता आणीबाणी जाहीर केली. न्यूजर्सीमध्ये १४ हजारांहून अधिक घरांचा वीजपुरवठा २४ तास खंडित झाला. पावसामुळे अनेक वाहने पाण्यात अडकली, तर



एक्स्प्रेस-वे आणि मुख्य रस्ते काही वेळांसाठी बंद करण्यात आले. विमान वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला असून, न्यूयॉर्क, न्यूजर्सी, वॉशिंग्टन आणि फिलाडेल्फियामधील अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

# काळू नदीवरील पुलाला दोन वर्षांतच मोठे भगदाड

■ मुरबाड

**मुरबाड-शहापूर-कर्जत** मार्गावरील काळू नदीवर नव्याने बांधलेल्या पुलाला मोठे भगदाड पडल्याची घटना घडली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी या निकृष्ट दर्जाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

काळू नदीवर उभारलेला पूल हा पूल केवळ दोन वर्षातच भेगांनी पोखरला होता. त्यातच आता पुलाच्या मधोमध मोठे भगदाड पडले असून ते अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. अशा परिस्थितीतही या पुलावरून अवजड वाहतूक सुरू आहे. त्यामुळे मोठ्या दुर्घटनेचा धोका नाकारता येत नाही.तरी संबंधित प्रशासनाने ही वाहतूक तत्काळ बंद करून या घटनेची तपासणी करावी आणि दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

# जिमखान्यांमध्ये सदस्यत्व सरकारी अधिकाऱ्यांना बक्षिस

■ मुंबई

**देशातील** जिमखान्यांसाठीच्या नवीन धोरणाद्वारे केंद्रीय व राज्य सरकारमधील अधिकाऱ्यांना जिमखान्याचे सदस्यत्व देणे बंधनकारक केले आहे. महसूल विभागाने याबाबत धोरण जारी केले आहे.

जिमखाना धोरण याआधी २०१७ मध्ये तयार करण्यात आले होते. गेल्या वर्षी काही सुधारणा करण्यात आल्या. याच धोरणात आता नवीन मार्गदर्शक तत्त्वांचा अंतर्भाव करण्यात आला असून त्याद्वारे सरकारी अधिकाऱ्यांना जिमखाना सदस्यत्व द्यावे लागणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांना सदस्यत्वासाठीचे अनेक अधिकार देण्यात आले आहेत. यानुसार केंद्र व राज्य सरकारच्या अ गटातील अधिकाऱ्यांना जिमखान्याच्या क्षमतेच्या पाच टक्के सदस्यत्व द्यावे लागणार आहे. जिमखान्यांना ज्या अधिकाऱ्यांकडे सलग पाच वर्षे सदस्यत्व आहे अशा ५ अधिकाऱ्यांना कायम सदस्यत्वही द्यावे लागणार आहे. जिमखान्यांमधील सदस्यत्वासाठीचे सरकारी अधिकाऱ्यांसाठी नवे शुल्क पत्रकही तयार करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे यापुढे जिमखान्यांना राज्य सरकारला प्रतिवर्ष भाडेही द्यावे लागणार आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर ४ दिवसांत ५ अपघात

■ रत्नागिरी

**मुंबई-गोवा** महामार्गावरील अपघातांची मालिका सुरूच असून गेल्या चार दिवसांत पाच अपघात झाले आहेत. आज मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे कोलेटी परिसरात सकाळी एसटी आणि टेम्पोची धडक झाली. या अपघातात टेम्पो चालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला असून, घटनास्थळी वाहतूक पोलीस आणि स्थानिक नागरिक मदतकार्य केले. गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार



पावसामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून त्यामुळे वाहनचालकांची आणि प्रवाशांची तारेवरची कसरत सुरू आहे. त्याआधी सोमवारी या मार्गावर हातखंबा येथे एलपीजी गॅस वाहून नेणारा टँकर उलटला. या अपघातामुळे १५ तास महामार्गावरील वाहतूक बंद होती. महामार्ग सुरू झाल्यानंतर परवा रात्री खामदेव नाका येथे ट्रकने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार तरुणी जखमी झाली. तर या महामार्गावरील हातखंबा जवळ दोन बस खड्ड्यात अडकल्या होत्या. यामुळे जवळजवळ एक तास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. काल या महामार्गावर एक कंटेनर उलटला. यामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

# नांदेडच्या शासकीय ग्रामीण रुग्णालयात उंदरांचा सुळसुळाट! व्हिडीओ व्हायरल

■ नांदेड

**नांदेड** जिल्ह्यातील कंधार येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात एका महिला रुग्णाच्या अंगावर उंदीर फिरत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यात महिला रुग्ण झोपलेली असताना तिच्या अंगावर उंदीर बिनधास्तपणे फिरताना दिसत आहे. ही घटना रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याने खळबळ माजली आहे.हा व्हिडीओ दुसऱ्या रुग्णाच्या नातेवाईकाने रेकॉर्ड केला असून, त्यात केवळ एकच नव्हे तर अनेक उंदीर रुग्णालयाच्या महिला वॉर्डात मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. या व्हिडीओमुळे सरकारी रुग्णालयातील आरोग्य यंत्रणेच्या हलगर्जीपणाचे विदारक चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. या प्रकाराआधीही, तीन दिवसांपूर्वीच नांदेडच्या श्री गुरु गोबिंदसिंघजी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या ६३ वर्षीय रमेश यन्नावार यांचा पाय उंदराने कुरतडल्याची घटना घडली होती. मधुमेह असलेल्या रमेश यांना २० जुलै रोजी शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी पहाटेच्या सुमारास त्यांचा पाय कुरतडल्याचे त्यांना लक्षात आले, मात्र तोवर उंदीर पसार झाला होता.या घटनांमुळे नांदेड जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांची दयनीय अवस्था आणि रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# पिंपरी कॅम्पमध्ये व्यापाऱ्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या

■ पुणे

**पुण्यातील** पिंपरी कॅम्प परिसरात व्यापारी तरूणाची दिवसढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. भावेश कंकरानी (२०) असे मृत तरूणाचे नाव आहे. आरोपी दुचाकीवरून आले. त्यांनी भावेशच्या दुकानासमोर येऊन त्याच्यावर अंधाधुंद गोळीबार केला. यानंतर त्यांनी भावेशच्या मृतदेहावरची सोनसाखळी लंपास करून घटनास्थळावरून पळ काढला.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. ही घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून पोलीस त्याआधारे आरोपींचा शोध घेत आहेत. यासाठी पिंपरी पोलिसांनी १० पोलीस पथके तयार केली आहेत. या घटनेचा व्हिडीओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पुण्यातील २७ वर्षीय जवानाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

■ पुणे

**पुण्यात** भारतीय सैन्य दलातील २७ वर्षीय सुभाष अनिल दाते (२७) या जवानाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. तो सैन्यदलातून पाच दिवसांची सुट्टी घेऊन आपल्या गावी आला होता. तो जम्मू-काश्मीर या येथे बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनमध्ये ड्रॉईंग एस्टॅब्लिशमेंट सुपरवाइझर या पदावर कार्यरत होता. तो पुण्यातील आंबेगाव तालुक्यातील राजपूरचा रहिवासी होता.



सैन्यात कार्यरत असताना पुढील परीक्षेचे पेपर देण्यासाठी सुभाष ५ दिवसांची सुट्टी घेऊन मामाच्या गावी राजपूर येथे आला होता. काल झोपेतून उठताना सुभाषच्या छातीत दुखू लागले. यावेळी सुभाषच्या कुटुंबियांनी त्यांना तळेघरच्या ग्रामीण रुग्णालयात नेले. पुढील उपचारांसाठी त्यांना घोडेगाव येथे पाठवण्यात आले. घोडेगाव येथे डॉक्टरांनी सुभाषला तपासून त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचे सांगितले. मंचर येथे शवविच्छेदन झाल्यानंतर त्याच्यावर राजपूर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेला आदिवासी भागातील मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# संजय राऊत-राज ठाकरे आज एकाच मंचावर येणार

■ मुंबई

**शेतकरी** कामगार पक्षाच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त उद्या पनवेलमध्ये मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि उबाठा खासदार संजय राऊत हे दोघे एकाच मंचावर येणार आहेत. अलीकडेच शेकापचे नेते जयंत पाटील यांनी राज ठाकरेंना वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी अधिकृत निमंत्रण दिले होते. त्यानंतर आता संजय राऊतही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचे निश्चित झाले आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज ठाकरे मातोश्री निवासस्थानी गेले होते आणि तेथे संजय राऊतांनी त्यांचे स्वागत केले होते. त्यानंतर हे दोन्ही नेते एकाच मंचावर येणार आहेत. त्यामुळे राजकीय वर्तुळामध्ये चर्चा रंगू लागली आहे.

# वनतारा महादेवी हत्तीणीला परत पाठवण्यास सकारात्मक

**मंत्री आबिटकर यांची माहिती**

■ कोल्हापूर

**जनभावनांचा** आदर करत वनतारा संस्था महादेवी उर्फ माधुरी हत्तीणीला कोल्हापुरात परत पाठवण्यासाठी सकारात्मक आहे, अशी माहिती पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिली. महादेवीच्या मुद्द्यावर आबिटकर यांच्यासोबत वनतारा संस्थेच्या सीईओंची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीनंतर आबिटकरांनी माध्यमांशी संवाद साधला. जोपर्यंत संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत महादेवीचे परतणे शक्य होणार नाही, असेही आबिटकर यांनी




यावेळी स्पष्ट केले.

वनतारा संस्थेच्या सीईओंनी करवीर मठाच्या महास्वामींना स्पष्टपणे सांगितले आहे की, महादेवीला कोल्हापुरातून नेण्याच्या संपूर्ण प्रकरणात वनताराचा कोणताही थेट संबंध नाही. मात्र, कोल्हापूरकरांच्या भावना तीव्र आहेत आणि याचा आदर करून आम्ही महादेवीला परत देण्यास तयार आहोत. मात्र, या हस्तांतरणासाठी आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि वनविभागाच्या परवानग्यांचा समावेश आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय महादेवीला कोल्हापुरात आणता येणार नाही. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर या प्रक्रियेला गती देण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. या चर्चेदरम्यान एका सकारात्मक मुद्द्यावरही चर्चा झाली. वनताराने कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी परिसरात आपले एक युनिट सुरू करण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शवली. हे युनिट सुरू झाले.

# सोलापुरात शिक्षकाकडून दहावीच्या मुलीचा विनयभंग

■ सोलापुर

**सोलापुरातील** एका नामांकित शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांनीचा ५६ वर्षीय शिक्षकाने विनयभंग केला. १९ एप्रिल ते ३ जुलै यादरम्यान शाळेच्या पार्किंगमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला. या शिक्षकाने धमकावल्याने विद्यार्थिनीने घाबरून कोणाकडेही याबाबत वाच्यता केली नाही. याचाच फायदा उचलून शिक्षकाने वारंवार पीडितेच्याचा विनयभंग केला.

तुला काही अक्कल नाही. तू काही कामाची नाहीस. तू दहावीला आहेस, तू आता माझ्या तावडीत सापडली आहेस. असे अनेक प्रकारे हिणवत शिक्षकाने तिचा विनयभंग केला. हा धक्कादायक प्रकार खासगी शिकवणीच्या प्राचार्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी थेट पीडितेच्या कुटुंबियांशी संपर्क साधत गुन्हा दाखल करण्याचा सल्ला दिला.



# मी माझ्या भाषेचा अपमान सहन करणार नाही - विशाखा सुभेदार

**फू बाई फू, महाराष्ट्राची हास्य जत्रा असे कॉमेडी शो, 'शांतेचं कार्ट चालू आहे,' 'कुर्रर,' 'द दमयंती दामले' अशी लोकप्रिय नाटके, 'येड्यांची जत्रा,' 'येरे येरे पैसा,' 'झपाटलेला २,' 'पाणीपुरी' इत्यादी दमदार इनिंग खेळणाऱ्या आणि रसिकांची दर्जेदार हसवणूक करणारी लाडकी अभिनेत्री म्हणजे विशाखा सुभेदार. तिच्याशी केलेले हे हितगुज...**

मकरंद जोशी

**तू गेली अनेक वर्षे नाटकातून भूमिका करत आहेस. टीव्ही शो व सिनेमातही तुला लोकप्रियता मिळाली. यातील तुझं आवडतं माध्यम कोणतं?**



मला हा प्रश्न अनेकदा विचारला जातो आणि माझं नेहमी एकच उत्तर असतं की, मला सगळी माध्यमं आवडतात. नाटकच जास्त आणि मालिका कमी असं नाही. प्रत्येक माध्यमाची एक वेगळी गंमत आहे, प्रत्येकाची वेगळी ताकद आहे. कलाकार म्हणून मला सर्व माध्यमांमध्ये काम करायला मिळत आहे, हे माझं भाग्यच आहे. नाटकामध्ये तुम्ही प्रेक्षकांना थेट सामोरे जात असता, त्यामुळे त्यांचा प्रतिसाद, अभिप्राय लगेच मिळतो. तुमचं काम आवडलं का नाही, त्यातलं काय आवडलं हे प्रेक्षक लगेच येऊन सांगतात. नाटकात तुम्हाला तुमची व्यक्तिरेखा आणखी फुलवायला वाव असतो. सीरियलमध्ये तुमची ओळख प्रेक्षकांच्या मनावर ठसायला काही एपिसोड जावे लागतात. सीरिअल घराघरात पाहिल्या जात असल्यामुळे तुमची ही ओळख घराघरात पक्की होते. तर सिनेमा दोन अडीच तासांचा असल्याने तिथे लहानशा सीनमध्ये देखील स्वत:ला सिद्ध करणं आवश्यक असतं.

**सध्या तुझं 'द दमयंती दामले' हे नाटक प्रेक्षकांच्या पसंतीला उतरलं आहे.**

या नाटकाला प्रेक्षकांचा फार उत्तम प्रतिसाद मिळत आहे. माझ्यासाठी सांगायचं तर, माझ्या अन्य भूमिकांसारखी ही फक्त विनोदी व्यक्तिरेखा नाही, तर त्या व्यक्तिरेखेला अनेक कंगोरे आहेत आणि ते कौटुंबिक स्तरावरचे आहेत. त्यामुळे प्रयोगानंतर मला भेटायला येणारे प्रेक्षक सांगतात की, आम्ही तुमच्या भूमिकेशी रिलेट करतो, आमची सून अशीच आहे.

**दोन वर्षांपूर्वी तू एका वेगळ्या भूमिकेत प्रवेश केला, 'कुर्रर' या नाटकाच्या निमित्ताने तू चक्क निर्माती झालीस.**

हो, माझी मैत्रिण पूनम जाधव हिच्यासह मी जाणीवपूर्वक निर्मातीची भूमिका स्वीकारत 'कुर्रर' हे नाटक केले. मी नाट्य निर्मितीचा निर्णय घेतला, त्याच दिवशी मी ठरवलं होतं की, आपल्या नाटकात काम करणारे कलाकार, तंत्रज्ञ, बॅक स्टेज आर्टिस्ट यापैकी कुणाचंही पाकीट कधीच बाकी ठेवायचं नाही. नाटकाला बुकिंग होईल की



नाही, पण आपल्या कलाकारांना, टीमला त्याचा फटका नाही बसू द्यायचा. कारण विविध संस्था, प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करताना मला असे अनुभव आले होते. या नाटकाचे अडीचशेपेक्षा जास्त प्रयोग झाले. निर्माती म्हणून मला काही वेळा जरा कठोरपणे वागावं लागत होतं, पण शिस्त पाळण्यासाठी ते आवश्यक होतं.

**मराठी सिनेमांमध्ये तू जरा कमीच दिसतेस.**

डेली सोप सुरू असेल तेव्हा वेळ काढणं कठीण जातं. शिवाय साचेबंद भूमिका असेल तर तो सिनेमा करायला मी नकार देते. मध्यंतरी नावातच 'सासू' असलेले तीन-चार चित्रपट केले, पण मलाच ते इतके एकसारखे वाटले की, यापुढे अशा भूमिका करायच्या नाहीत असं ठरवलं.

**तू काही वर्षांपूर्वी हिंदीत काम केलं होतंस आणि ते सुद्धा रेखाबरोबर, पण नंतर मात्र तू हिंदीत दिसली नाहीस, असं का?**

हो. 'सुपर नानी' या हिंदी चित्रपटात रेखा मध्यवर्ती भूमिकेत होती आणि मला त्यात काम करण्याची संधी मिळाली होती. मात्र आता मराठी मालिकांसाठी तारखा दिल्यानंतर हिंदीसाठी वेळ कुठून द्यायचा असा प्रश्न पडतो. पण मला हिंदीत काम करायची इच्छा नक्कीच आहे.

**आता विषय हिंदी-मराठी निघालाच आहे तर सध्या जो वाद सुरू आहे. महाराष्ट्रात हिंदीची सक्ती यावरून, ज्याबद्दल आपल्या अनेक मराठी सेलिब्रेटींनी गप्प बसणं पसंत केलं, तुला हे योग्य वाटतं का? या मराठी-हिंदी वादाबद्दल तुझी भूमिका काय आहे?**

समाजमाध्यमांवर कुणाचेच नियंत्रण नाही, त्यामुळे माझ्यासारखी प्रकाशझोतातली व्यक्ती एखाद्या विषयावर आपलं काही मत व्यक्त करते तेव्हा तत्काळ ट्रोलिंग सुरू होतं व अनेकदा ते खालच्या पातळीवरचं असतं. त्यामुळे एखाद्या संवेदनशील विषयावर जाहीरपणे बोलायला सेलिब्रेटी अनेकदा तयार नसतात. आता जो हिंदी-मराठी वाद सुरू आहे, हिंदी किंवा इंग्रजीचं मराठीवर आक्रमण होत आहे असं आपण म्हणतो, तेव्हा आपण स्वतः माय मराठी जपण्याबाबत, वापरण्याबाबत किती आग्रही आहोत? याचाही विचार केला पाहिजे. आपल्या नेहमीच्या बोलण्यात आपण सगळेच इंग्लिश-हिंदी शब्द सर्रास वापरतो आणि जर एखादा शुद्ध मराठीत बोलत असेल तर उलट आपणच भुवया उंचावतो. आपल्या भाषेशिवाय अन्य भाषा शिकणं, वापरणं गैर नाही. पण आपणच आपल्या भाषेला दुय्यम लेखणं हे अतिशय वाईट आहे. मी हिंदी गाण्यांवर रील्स करते, मला हिंदी सिनेमा-सीरियलमध्ये काम करायचं आहे, पण म्हणून मी माझ्या भाषेचा अपमान सहन करणार नाही.

**गेली अनेक वर्षे आम्ही विशाखा मधली एक उत्तम अभिनेत्री बघितली आहे. पण याच विशाखात एक नृत्यांगनाही दडलेली आहे. तू नृत्याचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतलं आहेस. ती विशाखा कुठे हरवली आहे?**

ती विशाखा अजिबात हरवलेली नाही. मला अभिनयाची गोडी नृत्याच्या प्रशिक्षणामुळेच लागली आणि माझ्यातली अभिनेत्री नृत्यामुळेच समृद्ध झाली. आज प्रेक्षकांना माझा चेहरा बोलका वाटतो, माझ्या हालचाली



डौलदार वाटतात, याचं श्रेय माझ्यात भिनलेल्या नृत्याला आहे. त्यामुळे जर एखादी नृत्याला वाव देणारी भूमिका मिळाली, तर मला नक्की करायला आवडेल. तर अशी ही विशाखा सुभेदार, उत्तम, प्रामाणिक अभिनेत्री आणि निर्माती आहे, जी चांगल्या नाटकाच्या शोधात आहे. ती स्पष्टपणे आणि परखडपणे बोलते, तरीही निष्कारण कोणत्याही वादात न पडता पुढे जाते. तिच्या अखंड ऊर्जा आणि प्रभावी अभिनयाचं रहस्य तिच्या या स्वभावातच लपलेलं आहे.







## या दिवशी कन्नप्पा ओटीटीवर

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीद्वारे यावर्षी 'कन्नप्पा' हा मोठ्या बजेटचा चित्रपट २७ जून रोजी प्रदर्शित करण्यात आला होता. श्री शंकराचा सर्वात महान भक्त असलेल्या कन्नप्पाची कथा यामध्ये दाखवण्यात आली होती. दाक्षिणात्य सुपरस्टार विष्णू मंचूसह या सिनेमात अक्षय कुमार, प्रभास, काजल अग्रवाल, मोहनलाल आदि स्टार कलाकार आहेत. परंतु तरीही हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फारसे यश मिळवू शकला नाही. इतकेच नाही तर हा सिनेमा ओटीटीवर प्रदर्शित करण्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र आता याच्या ओटीटी प्रदर्शनाची तारीख समोर आली आहे. मूळ तेलुगू भाषेमध्ये बनलेला आणि हिंदीसह अनेक भाषांमध्ये प्रदर्शित झालेला हा सिनेमा आता २५ ऑगस्ट रोजी ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे.




## तृप्तीचे तारे बुलंद



'ॲनिमल' या चित्रपटातील भाभी नंबर २ मुळे लोकप्रिय व प्रसिद्ध झालेली अभिनेत्री तृप्ती डिमरीचा 'धडक २' हा सिनेमा कालच प्रदर्शित झाला आहे. त्याचे बॉक्स ऑफिस भविष्य लवकरच कळेल. परंतु तृप्तीच्या हातामध्ये सध्या आणखी काही चांगले चित्रपट आहेत, जे पुढच्या काही काळात प्रदर्शित होणार आहेत.


दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांचा आगामी ॲक्शन चित्रपट 'अर्जुन उस्तारा' मध्ये तृप्ती प्रेक्षकांना दिसणार आहे. खास गोष्ट ही की, या सिनेमामध्ये ती केवळ ॲक्शन करणार नसून स्टार शाहिद कपूरसह पहिल्यांदा मोठ्या पडद्यावर चमकणार आहे. साजिद नाडियाडवाला यांची चित्रसंस्था हा चित्रपट बनवत असून, त्याची कथा अंडरवर्ल्डवर आधारित आहे. सुरेश त्रिवेणी दिग्दर्शित 'मां बहन' या विनोदी सिनेमामध्ये देखील तृप्ती काम करत आहे. यामध्ये तिच्यासह माधुरी दीक्षित



आहे, जी तृप्तीच्या आईची भूमिका करत आहे. हा सिनेमा ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांचा बिग बजेट चित्रपट 'स्पिरिट'मध्ये तृप्ती प्रभाससह रोमांस करताना दिसेल. दीपिका पदुकोणने हा सिनेमा सोडल्यानंतर तो तृप्तीच्या झोळीत येऊन पडला आहे. वांगा यांच्या ॲनिमल पार्क या 'ॲनिमल'चा सिक्केल असलेल्या सिनेमामध्ये देखील तृप्तीची निवड झाली आहे. एकूण काय तर तृप्तीचे तारे सध्या बुलंद आहेत.

## 'सैयारा'चे स्वस्त मार्केटिंग?

अहान पांडे, अनित पड्डा आणि दिग्दर्शक मोहित सुरीचा 'सैयारा' हा सिनेमा यावर्षाचा सर्वात आश्चर्यकारक यशस्वी चित्रपट मानला जात आहे. या चित्रपटाने कमाईचे सर्व बॉक्स ऑफिस तोडले असल्याचे बोलले जात आहे. परंतु 'सैयारा'हा सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर तीन-चार दिवसांतच सोशल मीडियावर प्रेक्षक रडत असल्याचे आणि बेशुध्द होत असल्याचे व्हिडिओ तुम्ही नक्कीच बघितले असतील. त्याचप्रमाणे प्रेक्षक खरंच सिनेमागृहांमध्ये रडत आणि बेशुध्द पडत आहेत. विधानी यांचा हा खुलासा देखील 'सैयारा'च्या हलक्या दर्जाच्या पब्लिसिटी-मार्केटिंगप्रमाणे हलका आहे. पैशांच्या जोरावर यशराज फिल्म्सचा सर्वसर्वा असलेला आदित्य चोप्रा 'सैयारा'चे हे मार्केटिंग करत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे यशराज फिल्म्स ही चित्रपट संस्था भयंकर कर्जामध्ये बुडाली आहे. काही काळापूर्वी तर आदित्य चोप्रा देणेकऱ्यांना




तरुण-तरुणी 'सैयारा'च्या नायक-नायिकांप्रमाणे मोटरसायकलवर स्वेटर आणि जर्सी लपेटून बसतानाचे रील्स देखील तुम्ही नक्कीच पाहिल्या असणार. अनेकजण याविषयी म्हणत आहेत की हा चित्रपटांच्या मार्केटिंगचा एक भाग आहे. 'सैयारा'ची ही पब्लिसिटी हास्यास्पद बनली आहे. म्हणूनच की काय, या चित्रपटाचे निर्माता आणि यशराज फिल्म्सचे सीईओ अक्षय विधानी यांना माध्यमांचा आधार घेऊन हे सांगण्याची वेळ आली आहे की, आमचा हा पब्लिसिटी स्टंट नसून चुकवण्यासाठी चेहरा लपवत किंवा रात्रीच्या वेळी ऑफिसमध्ये जात असल्याचे वृत्त कानी आले होते. त्यामुळे 'सैयारा'सारख्या कमी बजेटमध्ये तयार केलेल्या प्रेमपटावर संस्थेची मदार आहे. कुठलाही प्रेमपट बऱ्याच अंशी यशस्वी होत असतो. त्यामुळे मार्केटिंगचे हे स्वस्त फंडे वापरून आदित्य आणि त्याची टीम चित्रपट यशस्वी करण्याच्या पाठी लागली आहे. परंतु आदित्य चोप्राला हे माहिती नाही की, आजची जनता सर्व काही जाणते.

## काय आहे 'बिग बॉस १९' टीझरमध्ये ?

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय तरीही वादग्रस्त शो 'बिग बॉस १९'च्या चाहत्यांनी आतुरतेने वाट पाहिली आहे. आता या शोचा एक टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये कोणकोणते सेलिब्रिटीज सहभागी होणार याविषयी गुप्तता पाळण्यात आली असली तरी टीझरमध्ये भाईजान सलमान खानला पाहिल्यावर वाटत आहे की, यावेळी या शोमध्ये खूप मनोरंजन होणार आहे. म्हणजे तसे खुद्द सलमानच टीझरमध्ये सांगताना दिसतो आहे. सदर टीझरमध्ये सलमान खान एका राजनेत्याच्या वेशभूषेमध्ये असून प्रेक्षकांना जणू भाषण देत आहे. या सीझनमध्ये एक मोठा ट्विस्ट प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे, तो म्हणजे घरतल्या लोकांचे सरकार. याचा अर्थ असा आहे की, यावेळी बिग बॉसच्या घरात सहभागी झालेले स्पर्धक घराचे सरकार चालवणार आहेत आणि त्यांच्या मतानुसार घर चालणार आहे. आत्तापर्यंतच्या बिग बॉसच्या सीझनमध्ये असे कधी घडले नव्हते. सलमान टीझरमध्ये म्हणतो की, मित्र आणि शत्रू, तयार व्हा




कारण यावेळी घरच्यांचे सरकार आहे. खूप मजा येणार आहे यार. कधी हा शो सुरू होत आहे? तर येत्या २४ ऑगस्टपासून हा शो सुरू होत आहे, जो जानेवारी २०२६ पर्यंत चालणार आहे. सूत्रांच्या माहितीप्रमाणे या सीझनमध्ये सहभागी होण्यासाठी आत्तापर्यंत मीरा देवस्थळे, लता सबरवाल, अपूर्वा मुखीजा, पूरव झा, नील मोटवानी, अरहान अंसारी, शशांक व्यास, खुशी दुबे, शरद मल्होत्रा, मून बनर्जी, गौव तनेजा उर्फ फ्लाईंग बीस्ट, राम कपूर आणि गौतमी कपूर या सेलिब्रिटीजशी संपर्क साधला गेला आहे.





## अक्षय विरुद्ध अनुराग

'गँग्स ऑफ वासेपूर'सारखा चित्रपट बनवणारा आणि कायम कुठल्या ना कुठल्या विषयावर वादग्रस्त वक्तव्य करणारा दिग्दर्शक अनुराग कश्यपचा कुठलाही सिनेमा गेल्या अनेक काळापासून प्रदर्शित झालेला नाही. परंतु नुकतेच अनुरागने आपल्या आगामी चित्रपट 'निशानची' घोषणा केली आहे. या सिनेमाची चर्चा बरेच महिने सुरू होती.

'निशानची' फर्स्ट लूक पोस्टर समोर आले असून, त्यावर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखसुद्धा जाहीर करण्यात आली आहे. जाणून घेऊया, या सिनेमाविषयी. १९ सप्टेंबर रोजी 'निशानची' सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होणार असून, या चित्रपटामध्ये मोनिका पवार, मोहम्मद झीशान अय्युब, कुमुद मिश्रा आणि वेधिका पिंटू आदी कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. हा सिनेमा एक ब्लॅक कॉमेडी थ्रिलर आहे. चित्रपटाच्या कथेविषयी सांगायचे तर गुन्हेगारी, वासना आणि शक्तिप्रदर्शन हा या सिनेमाचा विषय आहे. यामध्ये दोन जुळे भाऊ वैरी म्हणून एकमेकांसमोर उभे राहतात. १९ सप्टेंबर रोजी अक्षय कुमार आणि अरशद वारसी अभिनीत कोर्टरूम ड्रामा असलेला 'जॉली एलएलबी ३' देखील प्रदर्शित होत आहे. त्यामुळे अक्षय विरुद्ध अनुराग हा सामना बॉक्स ऑफिसवर होणार आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३३०



**आडवे शब्द –**

२. मृग, हरीण ४. सोम, चंद्र ५. शासनाला करातून मिळालेले उत्पन्न ८. डुक्कर १०. नर्तकी ११. माजलेला १२. अंगारक ग्रह १३. केर काढण्याचे साधन १५. खिडकीची काच १६. दागदागिने १८. धन, वित्त २१. संत ज्ञानेश्वरांची बहीण २२. मौक्तिक २३. शपथ २४. डोंगर २६. सच्चा, प्रामाणिक २७. लेखणीचा सुटसुटीत प्रकार २९. आक्रोश ३१. फूल, मुलींचे एक नाव ३३. धमकावणी ३५. छाती ३६. जमा आणि खर्च यांची बरोबरी ३९. औषध ४१. पंढरपूरची पायी यात्रा ४२. रस्ता ४३. भिस्त ४४. जबाबदारी ४५. श्रीकृष्णाच्या जिवावर उठलेली मावशी ४७. विद्ध, जखमी ४९. किरकोळ, नगण्य ५०. घ्राणेंद्रिय ५१. धूम्रपानाचा प्रकार, चुट्टा ५२. अफवा, कंडी ५३. बंगली ५५. वडील, पिता ५७. रमीच्या खेळातील एक महत्त्वाचे पान ५९. कयास, अंदाज ६१. अंबाडा, चिमणीचे घरटे ६२. सहाय्य करणारा कर्मचारी ६३. खास पाहुणचार ६४. एक अप्सरा, शकुंतलेची आई ६६. सर्व, तमाम ६८. एक आणि अर्धा ७१. यादव वंशाचा मुख्य, श्रीकृष्ण ७२. आद्य कीर्तनकार ७४. हिरव्या रंगाचे रत्न, पाचू ७६. साठ मिनीटे ७७. झाड ७८. आश्चर्य, अचंबा ८०. गायीचे पिल्लू ८२. भयभीत, घाबरलेला ८४. दिव्याच्या वातीचे पुढचे टोक ८५. झगडा, भांडण ८९. कट्टर ९०. ठाम, दृढ ९१. धरणीवर कोसळलेला ९२. मरण पावलेला, मयत ९४. वैभव, शान ९६. धार्मिक वसा ९७. फुलांचा अलंकार १०१. पूल (इंग्रजीत) १०२. फिरणे १०३. जुनाट विचारांचा १०३. प्रतिष्ठित

**उभे शब्द –**

१. असत्य, खोटे २. समारोप, अखेर ३. नकली ४. संपत्ती, संपदा ५. फळातला खाद्यभाग ६. कातर, भावनाप्रधान ७. गाण्याची तान ८. पृथ्वी ९. राज्यसुख ११. यथेच्छ, मनसोक्त १२. भाजीपाला, फळे वगैरे खरेदीची जागा १४. अवांतर, इतर १६. जिम्मेदारी १७. झावळीच्या पातीतील काडी १९. बैठक, भाषणाची जागा २०. आधी केलेले सत्कर्म २२. सुंदर हस्ताक्षराचे वर्णन २५. अंधार २८. अलीकडचा, ताजा ३०. अंगरखा ३२. मोठी नदी ३४. नेमस्त ३७. चोप, बदडणे ३८. भ्रमर, मुलांचे एक नाव ४०. भारत-पाक सीमेवरील महत्त्वाचे ठाणे ४२. फेटा ४३. उसळीचे लोकप्रिय कडधान्य ४५. वाडवडील ४६. नावेचा मुख्य ४८. प्रवासी, यात्रेकरू ४९. समोरच्याचे ऐकून घेणारा, समंजस ५०. करून सवरून अंग झटकणारा ५४. काया, देह ५६. प्रणाम, नमस्कार ५७. जतन, सांभाळ ५८. शकुन बघण्याची विद्या ५९. दुसऱ्यासाठी घेतलेला त्रास, तोशीस ६०. निकष न लावता केलेली निवड ६४. पालखी, शिबिका ६५. शाश्वत, पर्मनंट ६७. सांगणे ६९. भगवान शंकराचे वाद्य ७०. नमुना, वानगी ७२. घोड्याच्या पायाला ठोकलेला पत्रा ७३. औषध ७५. धनुर्धराची बाणांची पिशवी, भाता ७६. मातबर, अभिजन ७७. जलद, वेगवान ७९. पृथ्वी, वसुधा ८१. मीठ, लोणचे ठेवण्यासाठी चिनीमातीचे भांडे ८३. बाजू, तरफ ८४. चांदणे, मुलींचे एक नाव ८५. ताकीद, इशारा ८६. वात्रट ८७. रात्री भटकणारा ८८. लता, वल्लरी ९०. दुःख, वेदना ९३. पोशाख ९५. गृहकलह ९६. श्रीकृष्णाचे बालपण गेले ती जागा ९८. लोक, माणसे ९९. जेवणाची थाळी, तगारी १००. आतप •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३२९चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. दट्ट्या ३. तपास ५. रमणीय ९. लेंगा ११. कंदर्प १३. तरणी १४. आखणी १५. थालीपीठ १८. दश १९. खुमासदार २१. वंशज २२. पराठा २४. रमताराम २५. रसमलई २७. भकास ३०. दादर ३१. भाट ३२. भस्म ३४. दहन ३६. उदंड ३७. और ३८. सारा ४०. कंपू ४१. वरकड ४४. नवती ४६. पण ४७. मानिनी ४९. भलतासलता ५१. शिखा ५२. जतन ५४. पवित्रक ५५. अमात्य ५६. लता ५८. बाधा ५९. कर्क ६०. दशरथ ६३. कपार ६४. दमदाटी ६६. चिकाटी ६७. हीणकस ७०. रत्तल ७१. पाद ७२. वाडा ७३. धारातीर्थ ७५. यथातथा ७७. क्षर ७९. संप ८०. तुकाराम ८२. खातरजमा ८५. अंबालिका ८७. संगमरवर ९०. गर्जना ९२. बंड ९३. कटाक्षाने ९७. नगद ९८. झुबे ९९. फितुरी १००. ढेरपोट्या १०३. मदार १०४. प्रणव १०५. मात १०६. एकवाक्यता

**उभे शब्द** : १. एकंदर २. दर्प ३. तरस ४. पाणीदार ५. रखवालदार ६. मणी ७. यथाशक्ती ८. चंपी १०. गारठा १२. दशमग्रह १३. तमाम १६. लीज १७. ठपका १९. खुराडे २०. रसद २३. रासभ २६. ईद २७. भटकंती २८. सौदण ३०. रसा ३३. स्मरण ३४. दमामा ३५. नवनीत ३६. उकल ३९. रान ४२. कलत्र ४३. कालहरण ४५. वर्णमाला ४६. पखालपार्वती ४८. निजधाम ४९. भविष्यकाल ५०. ताकद ५३. नकटी ५७. तार ५८. बादरायण संबंध ६१. शहीद ६२. थकवा ६५. दानत ६६. चित्तथरारक ६८. सडासंमार्जन ६९. मेधा ७१. पारखा ७४. रामबाण ७६. थातुरमातूर ७८. खर ८१. काव ८३. तट्टू ८४. जग ८६. काळेबेरे ८८. गड ८९. रिक्षा ९१. नागरिक ९४. टाचण ९५. नेढे ९६. कपोत ९९. फिदा १०१. रमा १०२. ऐक्य

## कोकाटेंचे फक्त खाते का बदलले? अजित पवारांनी स्पष्टीकरण द्यावे

पान १ वरून

देताना म्हटले की, एका शेतकऱ्याच्या मुलाला कृषिखाते मिळाले की, यासारखा आनंद कुठलाच नाही. कृषी खात्याच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल, याकडे माझे लक्ष असेल.

तर कृषी खाते गमावावे लागलेले मंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले की, अजित पवार यांनी जो निर्णय घेतला तो मान्य आहे. दत्ता भरणे शतकरी पुत्र आहेत. त्यांच्यामुळे कृषी खात्याला न्याय मिळेल.

या विषयावर बोलताना मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, अजित पवार यांनी कृषिमंत्रिपदाची सर्वात पहिली ऑफर मला दिली होती. मात्र कृषिमंत्री या पदाला ग्रामीण भागातील व्यक्ती जास्त न्याय देऊ शकेल, अशी माझी त्यावेळी भूमिका होती.

## लाडकी बहीणच्या जुलै हप्त्यासाठी सामाजिक न्यायचे ४१० कोटी वळवले

पान १ वरून

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या कमी करण्यात आली असली तरी या

योजनेसाठी निधी गोळा करताना राज्य सरकारला अडचणी येत आहेत. यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती, नवबौद्ध व इतर मागास घटकांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासाच्या अनेक योजनांचा निधी वळवून घेण्यात आला. त्यामुळे या खात्याला निधी अपुरा पडणार आहे. या निधीतून विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतीगृह, स्वाधार अशा अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येतात.

सरकारच्या निधी वळवण्याच्या निर्णयावर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी तीव्र टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, जे कोणी फार विरोध करु शकणार नाहीत अशा मागासवर्गीयांवर शासन अन्याय करत आहे. या खात्याचे मंत्री संजय शिरसाट आपल्याच खात्याचा निधी रोखू शकत नाही. त्यांची भूमिकाही ते मांडू शकत नाहीत. त्यांच्यामध्ये हे खाते चालवण्याची क्रयशक्ती आहे का? हा प्रश्न आहे. निवडणुका जिंकण्यासाठी ही योजना आणली व सरसकट छाननी न करता पैसे देण्यात आले . आता दुर्बल घटकांचा निधी वापरुन त्यांच्यावर अन्याय केला जात आहे.

## दौंडच्या यवतमध्ये दोन गटात दगडफेक

पान १ वरून

यावेळी एका गटाच्या लोकांनी काही दुचाकी पेटवून दिल्या. तर काहींनी प्रार्थनास्थळाची तोडफोड केली. या प्रकरणात आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या सय्यद नावाच्या व्यक्तीसह एकाला ताब्यात घेतल्याची माहिती यवतचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी दिली.

या घटनेनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यवत येथे जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, मध्य प्रदेशात एक घटना घडली. त्याबाबत एका तरुणाने व्हॉट्सपवर पोस्ट केली. त्यानंतर ३० - ४० लोकांच्या जमावाने तोडफोड केली. यवतमध्ये ४८ तासांसाठी जमावबंदीचे आदेश लागू केले आहेत.

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that our client proposes to purchase Flat No. 704, A-Wing, in Sea Shell Apartment Co-operative Housing Society Ltd., on land bearing CTS Nos. 1228, 1289, and 1289-A, Village Versova, Seven Bungalows Road, Andheri (West), Mumbai–400061, from Mr. Sushil Kumar Agrawal, holder of Share Certificate No.28 , comprising 5 shares (Nos. 141 to 145) under Membership No. 28 corresponding to aforementioned flat.

Any person(s) claiming any right, title, interest, or objection in respect of the said flat and/or shares is hereby required to submit the same in writing, along with supporting documents, to the undersigned within 14 (fourteen) days from the date of this notice. Failing such intimation within the stipulated period, it shall be conclusively presumed that no adverse claim, right, title, interest, or demand exists over the said property, and the proposed transaction shall proceed unopposed. Any subsequent claims shall be deemed waived and barred.

Date: 02.08.2025

Issued by:
Vrudhi Legal and Associates
Adv. Latesh Faria
Shop No. 1, Magan Mahal,
Andheri court lane, M. V. Road,
Andheri (East), Mumbai – 400069
Mobile: 9869556829

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, मी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जागेसंदर्भात (**सदर जागा**) **श्री. राधाकृष्ण विनायक शहापूरकर (मालक)** यांच्या हक्कांची चौकशी करीत आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर जागेसंदर्भात विक्री, विनिमय, गहाण, प्रभार, भेट, न्यास, देखभाल, उत्तराधिकार, ताबा, भाडेकरार, वहिवाट, धारणाधिकार, अनुज्ञप्ती वा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभ हक्क/हितसंबंध, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणत्याही करारांतर्गत वा अन्य वासलात वा कोणत्याही विधि न्यायालयाद्वारे वा वैधानिक प्राधिकाऱ्यांद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूमाअंतर्गत वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात सर्व सहाय्यक दस्तावेजांच्या नोटरीकृत प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत असे समजण्यात येईल व अगदी असे दावे कायद्यांतर्गत अस्तित्वात असले तरी दावेदारांनी असे दावे अधित्यागित केले आहेत व /वा अटीविरहित व बदलता न येण्याजोग्या स्वरूपात अशा दाव्यांचा वापर करण्याचा हक्क सोडून दिला आहे असे समजण्यात येईल.

**अनुसूची (सदर जागेचे विवरण)**

निवासी फ्लॅट क्र. १२०२, मोजमापित अंदाजे १८९.४७चौरस मीटर (सदर फ्लॅट), १२ वा मजला, इमारतीचे नाव समर्पण रॉयल (**सदर इमारत**), सीटीएस क्र. १६३- ए व १६५ धारक जमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावर निर्मित, पश्चिम द्रुतगती महामार्ग, बोरिवली (पूर्व), मुंबई - ४०० ०६६ येथील, त्यावरील सदर इमारतीतील क्र. १३ व १४ धारक २ (दोन) बेसमेंट कार पार्किंग जागांसमवेत (**सदर कार पार्किंग जागा**) या मालमत्तेसंदर्भात समर्पण रॉयल को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., नोंदणीकरण क्र. MUM/WR/HSG/TC/15102/2011-2012/YEAR 11 द्वारे वितरीत विभिन्न क्र. २३१ ते २४० (दोन्ही समाविष्ट) धारक ५ (पाच) पूर्णत: प्रदानित शेअर्स संदर्भातील शेअर प्रमाणपत्र क्र. २४. सदर शेअर्स, सदर फ्लॅट व सदर कार पार्किंग जागा एकत्रितरीत्या सदर जागा म्हणून उल्लेखित.

**मुंबई, दि. ०२.०८.२०२५**

सही/-
**ॲडव्होकेट महेश लाड**
**द्वारा वाय. के. भगवागर ॲन्ड गं.**
डी ब्लॉक, ४ था मजला, शिवसागर इस्टेट,
डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - ४० ००१८.
mahesh@ykbco.in

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that our client proposes to purchase Flat No. 703, A-Wing, in Sea Shell Apartment Co-operative Housing Society Ltd., on land bearing CTS Nos. 1228, 1289, and 1289-A, Village Versova, Seven Bungalows Road, Andheri (West), Mumbai–400061, from Mr. Sushil Kumar Agrawal, holder of Share Certificate No.27 , comprising 5 shares (Nos. 136 to 140) under Membership No. 27 corresponding to aforementioned flat.

Any person(s) claiming any right, title, interest, or objection in respect of the said flat and/or shares is hereby required to submit the same in writing, along with supporting documents, to the undersigned within 14 (fourteen) days from the date of this notice. Failing such intimation within the stipulated period, it shall be conclusively presumed that no adverse claim, right, title, interest, or demand exists over the said property, and the proposed transaction shall proceed unopposed. Any subsequent claims shall be deemed waived and barred.

Date: 02.08.2025

Issued by:
Vrudhi Legal and Associates
Adv. Latesh Faria
Shop No. 1, Magan Mahal,
Andheri court lane, M. V. Road,
Andheri (East), Mumbai – 400069
Mobile: 9869556829

## ऑर्केस्ट्राचा परवाना परत केला

पान १ वरून- होता की, बारचा परवाना माझ्या पत्नीचा नावावर असला तरी हा बार गेली अनेक वर्षे शेट्टी नावाच्या व्यक्तीला भाड्याने चालवायला दिला आहे. त्यामुळे आपला या प्रकरणाशी थेट संबंध नाही. शिवाय ज्या व्यक्तीला तो भाड्याने दिला होता त्याच्यासोबतचा करारही रद्द केला होता. तर कोकणातील एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, मी तुझ्या पाठीशी आहे असे म्हणून योगेश कदम यांना जाहीर समर्थन दिले होते. मात्र, विरोधकांनी योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. या राजकीय दबावामुळे कदम कुटुंबाने आज सावली बारचा ऑर्केस्ट्रा परवाना सरकारला परत केल्याची माहिती आहे.

हा परवाना परत केल्यानंतरही उबाठा आमदार अनिल परब यांनी कदम कुटुंबावर पुन्हा हल्ला चढवत म्हणाले की, चोराने चोरीचा माल परत केला म्हणजे तो सुटत नसतो. परवाना परत केला म्हणजेच त्यांच्या बारमध्ये अवैध काम चालू होते, हे त्यांनी मान्य केले आहे. या प्रकरणात कायद्याने गुन्हा घडला आहे. ज्या गोष्टीला महाराष्ट्रामध्ये बंदी घातलेली होती ती त्यांच्या घरात सुरू होती. विशेष म्हणजे, बंदी घालण्याची जबाबदारी गृह राज्यमंत्र्यांवर होती. आम्ही केलेल्या आरोपांचे सर्व पुरावे मुख्यमंत्र्यांना सादर केले आहेत. पुरावे त्यांनी तपासावे आणि गृह राज्यमंत्र्यांवर कारवाई करावी आणि त्यांचा राजीनामा घ्यावा. कारण कायद्यानुसार, डान्स बारशी संबंधित कोणत्याही गैरप्रकारासाठी मूळ मालक जबाबदार असतो.

## एसटी महामंडळ राज्यभर पेट्रोल पंप सुरू करणार

■ मुंबई

**एसटी** महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि उत्पन्नाचे नवीन स्त्रोत निर्माण करण्यासाठी राज्यभरात व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्री पंप सुरू करण्यात येणार आहेत. ही महत्त्वपूर्ण माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त व्यावसायिक भागीदारीतून कार्यान्वित केला जाणार आहे.

याविषयी माहिती देताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सध्या अत्यंत नाजूक आहे. केवळ प्रवासी तिकिटांवर अवलंबून न राहता उत्पन्नाचे पर्यायी स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. त्याच धोरणाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. महामंडळ गेल्या ७० वर्षांपासून इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम यांसारख्या कंपन्यांकडून आपल्या बसेससाठी डिझेल खरेदी करते. सध्या महामंडळाकडे स्वतःच्या मालकीचे २५१ इंधन वितरण पंप आहेत, जे केवळ एसटी बसेससाठी वापरले जातात. त्यामुळे पेट्रोल पंप चालवण्याचा आणि व्यवस्थापनाचा पुरेसा अनुभव महामंडळाकडे आधीपासूनच आहे. याच अनुभवाचा फायदा घेत, आता हे पंप सर्वसामान्य ग्राहकांसाठी खुले करण्यात येणार आहेत. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या केंद्र सरकारी कंपन्यांशी व्यावसायिक करार करून ही योजना राबवण्यात येणार आहे. या पंपांवर इंधन विक्रीबरोबरच किरकोळ विक्रीसाठी रिटेल शॉपही उभारले जातील. यामुळे फक्त महामंडळाचे उत्पन्न वाढणार नाही, तर इतर संबंधित व्यवसायांनाही चालना मिळेल.

## संजय राऊत-राज ठाकरे आज एकाच मंचावर येणार

**मुंबई -** शेतकरी कामगार पक्षाच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त उद्या पनवेलमध्ये मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि उबाठा खासदार संजय राऊत हे दोघे एकाच मंचावर येणार आहेत. अलीकडेच शेकापचे नेते जयंत पाटील यांनी राज ठाकरेंना वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी अधिकृत निमंत्रण दिले होते. त्यानंतर आता संजय राऊतही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याचे निश्चित झाले आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज ठाकरे मातोश्री निवासस्थानी गेले होते.

**मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**

**निविदे करिता विनंती:**
**MRVC-W-304-OHE-KYN-BUD**

**(सिंगल टप्पा दोन लिफाफा ई-खरेदी निविदा प्रक्रिया)**

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. (एमआरवीसी) ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-४०००२० येथे आहे, यांचे द्वारे **"मध्य रेल्वेच्या कल्याण-बदलापूर (चेनेज ५४८०० मीटर - ६९४०० मीटर) दरम्यानच्या २५ केव्ही ओएचई कामांच्या डिझाइन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग. हे काम कल्याण-बदलापूर दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गाच्या संदर्भात आहे"** या साठी ई-निविदा मागवत आहे. निविदा आणि निविदा कागदपत्रांची तपशीलवार माहिती I R E P S वेबसाइट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. www.ireps.gov.in वेबसाइटवर संपूर्ण ई-निविदा सादर करण्याची **अंतिम तारीख २९.०८.२०२५ दुपारी १५:०० वाजेपर्यंत आहे. शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वेबसाइट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**

SNP 03

मे. श्रीमती एम. व्ही. भराडे
सिव्हील जज्ज सि.डी. डि.सि.जी. एम, नाशिक

निशाणी क्र. ८४
ॲड.ए.एन.ढोमसे

**जाहिर नोटीस**

रे.मु.नं. २७१ /२०१०

**नाशिक येथील मे. सिव्हील जज्ज साहेब, सिनिअर डिव्हीजन, नाशिक यांचे न्यायालयात....**

**श्री. संदिप गौतम जाधव**
रा. मु पोस्ट निळवंडी, ता. दिंडोरी जि. नाशिक — वादी

**विरुध्द**

८) **श्रीमती शिवनंदा जयंत ठाकुर**
रा. ३/३, इन्स्पेक्टर क्वॉर्टर, दहिवलकर,
बुवा मार्ग, पोलीस हेडक्वॉर्टर, नायगांव,
दादर (पूर्व) मुंबई - १४ — प्रतिवादी

प्रति,
विशेषतः **प्रतिवादी नं.८ श्रीमती शिवनंदा जयंत ठाकुर** यांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

अ) तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे गोवर्धन या गावचे शिवारातील गट नं.८१ याचा जुना सर्व्हे नं. २३, यांसी स्थानिक नाव वडाचा माळ या नावाने ओळखली जाणारी नाशिक महानगरपालिका हद्दीच्या बाहेरील शेत मिळकत यांसी क्षेत्र ० २ हे. ७५ आर, यांसी आकार रु.०५.५० पैसे यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत वादी यांनी नाशिक येथील दिवाणी न्यायाधिश, व. स्तर, १६ वे यांचे कोर्टातील रे.मु.नं. २७१/२०१० हा दावा डिक्लरेशनसाठी, वाटपासाठी व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदरचे दाव्यात प्रतिवादी नं.८ यांचे निशाणी १ च्या पत्यानुसार बेलिफ मार्फत समन्स काढले असता, ते न बजावता मे. कोर्टात परत आलेले आहे. त्यानंतर वादी यांनी पुन्हा प्रतिवादी नं.८ यांना आर.पी.ए.डी. द्वारे समन्स काढले असता तेही न बजावता मे. कोर्टात पाकीट परत आले आहे. त्यामुळे सदर परिस्थितीत प्रतिवादी नं.८ यांना समन्सची बजावणी होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे असल्याने सदर दाव्याचे कामकाजाबाबत प्रतिवादी नं.८ यांना माहिती व्हावी म्हणून सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी, प्रतिवादी नं.८ यांना सदरचे नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरचे दाव्यात प्रतिवादी नं.८ यांना सामील केलेले असून दाव्याचे कामकाजाची मे. कोर्टात पुढील तारीख नेमण्यात आलेली असून सदर तारखेस दिनांक ०४/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता व्यक्तीगत रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर व्हावे व लेखी म्हणणे मांडावे. याउपरही प्रतिवादी नं. ८ हजर न झाल्यास त्यांचे काहीएक म्हणणे नाही असे ग्राहय धरण्यात येईल व दाव्याचा निकाल एकतर्फी देण्यात येईल.

कळावे ही जाहिर नोटीस.

सदरची जाहीर नोटीस माझे सही शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली.

तारीख : २५/०७/२०२५

सही/- लिपीक — शिक्का — **सही/- अधीक्षक**, नाशिक, Civil Court (S.D.) Nashik

### निवारा होम फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** क्र.२२, २३, २४, २५/१०१/३, ३रा मजला बीएनआर कॉम्प्लेक्स, श्री रामा लेआउट, आरबीआय लेआउटच्या समोर, रमैया गार्डन, जेपी नगर ७ वा टप्पा, बेंगळुरू, कर्नाटक-५६००७८

nivara

**परिशिष्ट ४, (पहा नियम ८(१)) ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत जारी केलेले) आणि सदर नियमांच्या परिशिष्ट ४ मध्ये जारी केलेले.**

ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ता हे सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत **निवारा होम फायनान्स लिमिटेड**चे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ८ व ९ सहवाचिता कलम १३(१२) अन्वये असलेल्या अधिकाराअंतर्गत त्यांनी **निवारा होम फायनान्स लिमिटेड**च्या कर्जदार/जामीनदारांना मागणी सूचना वितरीत केली, ज्यात तपशील दिले आहेत त्यांनी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेत नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे. कर्जदार /सह-कर्जदार रक्कम भरण्यास असमर्थ ठरले असून कर्जदार व सर्वसामान्य जनतेस येथे सूचित करण्यात येत आहे की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) सहवाचिता नियम ८ व ९ अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकाराअंतर्गत खाली नमूद तारखेला मालमत्तेचा **ताबा** घेतलेला आहे.

| अ. क्र. | कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदाराचे नाव व पत्ता | देय रक्कम | स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | **१. हनुमंत यमनाप्पा कुऱ्हाडे**, गटक्र.२८२, प्लॉटक्र.३, आगरवाडी रोड, चाकण पुणे, चाकणखेड, महाराष्ट्र-४१०५०१, तसेच : **हनुमंत यमनाप्पा कुऱ्हाडे**, जे २०२, दुसरा मजला, स्वप्ननगरी, गट क्र.४०१, ४६०, नाशिक महामार्ग, चाकण, पुणे, महाराष्ट्र-४१०५०१ **२. अश्विता हनुमंत कुऱ्हाडे**, जे २०२, दुसरा मजला, स्वप्ननगरी, गट क्र.४०१, ४६०, नाशिक महामार्ग, चाकण, पुणे, महाराष्ट्र-४१०५०१, तसेच :;**अश्विता हनुमंत कुऱ्हाडे**, गट क्र.२८२, प्लॉट क्र.३, आगरवाडी रोड, चाकण पुणे, चाकणखेड, महाराष्ट्र-४१०५०१, **४. मिथुन बाबुराव चव्हाण**, क्र.६८, आंबेठाण गावठाण, आंबेठाण ग्राम, चाकण, खेड तालुका, पुणे, महाराष्ट्र -४१०५०१ | **रू.५,७०,४३४/- (रूपये पाच लाख सत्तर हजार चारशे चौतीस फक्त)** आणि त्यावरील व्याज आणि शुल्क. | वर उल्लेख केलेल्या अनुसूची-१ (निवासी मालमत्तेचे वर्णन) प्लॉट क्र.३, गट क्र.२८२, ए/पी चाकण, ता. खेड, जिल्हा पुणे - ४१०५०१ वरील जमीन आणि परिसराचे क्षेत्रफळ १४०१ चौ.फूट आणि बिल्ट अप क्षेत्र १२५० चौ.फूट आहे, जे चाकण, ता. खेड नोंदणी उपजिल्हा पुणे आणि जिल्हा पुणे - ४१०५०१ च्या शहर/गाव हद्दीत आहे आणि स्थित आहे. मालमत्तेच्या चतुसिमा : पूर्वेस: अंतर्गत १८ फूट रस्ता, पश्चिमेस: सदर गेट क्रमांकाचा उर्वरित भाग, उत्तरेस: श्री. विशाल म्हस्के यांचा खुला प्लॉट आणि इतरांचा प्लॉट क्र.४, दक्षिणेस: श्री. धनंजय गोरे यांचा खुला प्लॉट आणि इतरांचा प्लॉट क्र.२ |
| | **मागणी सूचना दिनांक : ०९.०५.२०२५** | | **ताबा सूचना दिनांक : २९.०७.२०२५** |
| २. | **१. शारदाबाई प्रल्हाद पाटील**, बेलदारपुरा, मु.पो. नेरी बु., जळगाव, महाराष्ट्र-४२५११४, तसेच: **शारदाबाई प्रल्हाद पाटील**, घर सीटीएस क्र.१९७ वर, बेलदारपुरा, मु.नेरी बु., ता.जामनेर जि. जळगाव, महाराष्ट्र -४२५११४, **२. प्रल्हाद विश्वनाथ पाटील**, बेलदारपुरा, मु.पो. नेरी बु., जळगाव, महाराष्ट्र-४२५११४, **३. युवराज धनराज पाटील**, भराडी, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र -४२४२०६ | **रू.३,६०,७०१/- (रूपये तीन लाख साठ हजार सातशे एक फक्त)** आणि त्यावरील व्याज आणि शुल्क. | जमीन परिसर घर क्र.६९०, सीटीएस क्र.१९७, बेलदापुरा जमीन क्षेत्रफळ ३५७.३६ चौ.फूट, मु.नेरी, ता. जामनेर, जिल्हा जळगाव, महाराष्ट्र - ४२५११४ येथील सर्व भाग व खंड. जळगाव शहर/गाव हद्दीत, नोंदणी उपजिल्हा जळगाव आणि जिल्हा जळगाव येथे जळगाव येथे स्थित बांधलेले आणि वसलेले आहे. मालमत्तेच्या चतुसिमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्वेकडून: सीटीएस क्र.१९६, पश्चिमेकडून: रस्ता, उत्तरेकडून: सीटीएस क्र.१९८, दक्षिणेकडून: रस्ता |
| | **मागणी सूचना दिनांक : ०९.०५.२०२५** | | **ताबा सूचना दिनांक : २९.०७.२०२५** |
| ३. | **१. सतीश जानराव परगरमोल**, घर क्र.९३०, म्हाडा कॉलनी, सातपूर, अंबड लिंक रोड, आंबेडकर चौक, चुंचाळे, अंबड, नाशिक, महाराष्ट्र-४२२०१०, तसेच: **सतीश जानराव परगरमोल**, सदनिका क्र.९३०, ईडब्ल्यूएस २०० सदनिका योजना, अ.क्र.१०५/२, चुंचाळे, नाशिक, महाराष्ट्र - ४२२०१०, **२. जानराव सकाराम परगरमोल, ३. अजय जानराव परगरमोल, ४. नितेश जानराव परगरमोल, ५. प्रमिला जानराव परगरमोल**, सर्व क्र.२ ते ५ राहणार : घर क्र.९३०, म्हाडा कॉलनी, सातपूर, अंबड लिंक रोड, आंबेडकर चौक, चुंचाळे, अंबड, नाशिक, महाराष्ट्र-४२२०१०, **६. भारत सुपाडा वारे**, एन-५१/केए-१/२०/५, शिहस्थ नगर, अंबड लिंक रोड, नाशिक, महाराष्ट्र - ४२२००९, **७. उमेशकुमार साहेबराव सोनोने**, घर क्र.९२२, म्हाडा कॉलनी, सातपूर, अंबड लिंक रोड, आंबेडकर चौक, चुंचाळे, अंबड, नाशिक, महाराष्ट्र-४२२०१० | **रू.५७४२२३.४०/- (रूपये पाच लाख चौऱ्याहत्तर हजार दोनशे तेवीस फक्त)** आणि त्यावरील व्याज आणि शुल्क. | अनुसूची 'ए' मालमत्ता - मालमत्ता असलेला सदनिका क्र.९३०, ईडब्ल्यूएस २०० सदनिका योजना, अ.क्र.१०५/२, चुंचाळे शिवार, नाशिक, पुढीलप्रमाणे चतुसिमा: पूर्वेकडून: ४५० मीटर रुंद मार्ग, पश्चिमेकडून: प्लॉट क्र.लिग - ८३, उत्तरेकडून: प्लॉट क्र.लिग - ८६, दक्षिणेकडून: सदनिका क्र.ईडब्ल्यूएस - ९२९ |
| | **मागणी सूचना दिनांक : २०.०५.२०२५** | | **ताबा सूचना दिनांक : २९.०७.२०२५** |

विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तांशी व्यवहार करू नये आणि मालमत्तांशी संबंधित कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या तारखांपासून नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याज खर्चासाठी आणि इतर खर्चासाठी **निवारा होम फायनान्स लिमिटेड**कडून शुल्क आकारले जाईल. कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात सरफायसी कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) ची तरतूद आहे.

**ठिकाण: महाराष्ट्र**
**दिनांक: २९.०७.२०२५**

**सही/-प्राधिकृत अधिकारी,**
**निवारा होम फायनान्स लिमिटेड**

# नवा काळ

• पुणे । शनिवार २ ऑगस्ट, २०२५ • पान -८


## व्यावसायिक गॅस सिलिंडर आणखी स्वस्त



**नवी दिल्ली -** व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत सलग पाचव्यांदा कपात करण्यात आली आहे. महिन्याच्या पहिल्याच दिवशी तेल आणि गॅस कंपन्यांनी किंमत कमी करण्याचा निर्णय घेतला असून, सरासरी ३४ रुपयांची घट झाली आहे. मार्चपासून आतापर्यंत एकूण १७० रुपयांची घसरण झाली आहे. आजपासून देशभरातील तेल आणि गॅस मार्केटिंग कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कपात केली आहे. दिल्लीत १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची नवी किंमत १,६३१.५० रुपये आहे, जी यापूर्वी १,६६५ रुपये होती. मुंबईत ती किंमत १,५८२ रुपये झाली असून, पूर्वी ती १,६१६.५० रुपये होती. कोलकात्यात व्यावसायिक सिलिंडर आता १,७३४ रुपयांना उपलब्ध आहे, तर याआधी ती १,७६९ रुपये होती. चेन्नईमध्ये ही किंमत १,७८९ रुपये झाली आहे, जी यापूर्वी १,८२३.५० रुपये होती. मात्र, ही कपात केवळ व्यावसायिक १९ किलो एलपीजी सिलिंडरसाठी आहे. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## पालिकेच्या पाणी खात्यातील कामगार १ नोव्हेंबरला संपावर

### वरळीच्या अभियांत्रिकी संकुलात निदर्शने

■ मुंबई

**सफाई** कामगारांनंतर आता मुंबई महापालिकेच्या पाणी खात्यातील कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. वरळीतील अभियांत्रिकी संकुलात संतप्त कामगारांनी नुकतीच निदर्शने करत विविध मागण्या केल्या. आपल्या मागण्यांची अंमलबजावणी ३१ ऑक्टोबरपर्यंत झाली नाही तर १ नोव्हेंबर रोजी पाणी खात्यातील सर्व कामगार संपावर जातील, असा इशारा द म्युनिसिपल युनियनने दिला.

सफाई आणि परिवहन खात्यातील कंत्राटीकरण विरोधात स्वच्छता कामगारांनी दिलेल्या यशस्वी लढ्यानंतर आता पाणी खात्यातील कामगारही विविध मागण्यांसाठी आक्रमक झाले आहेत. पाणी खात्यातील कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. खात्यातील अनेक पदे रिक्त असल्यामुळे कामगारांवर कामाचा ताण येत आहे. अनेकांना पदोन्नती मिळालेली नाही. त्यामुळे विविध संवर्गाची रिक्त व पदोन्नतीची पदे तातडीने भरावीत, पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या कालबद्ध पदोन्नतीचा फायदा देणे, सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत देणे, कामगारांना घाणकाम भत्ता द्यावा, मानीव कायमत्व व गोपनीय अहवालाची प्रत,प्रतवारी कामगारांना देणे,समान कामाला समान वेतन द्यावे, कामगारांना कर्तव्यसूची देणे, अतिकालीन भत्याचे योग्य पद्धतीने अधिदान करावे, चौकीवरून कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी वाहन उपलब्ध करावे तसेच चौक्यांची पुर्नबांधणी करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्याचीही मागणी या कामगारांनी केली आहे. या मागण्या पूर्ण न झाल्यास १ नोव्हेंबर रोजी संप करण्याचा निर्णय कामगारांनी केला आहे.

## बारामतीत एसटी बसमध्ये प्रवाशावर कोयत्याने हल्ला

■ बारामती

**बारामतीहून** इंदापूरला जाणाऱ्या एसटी बसमध्ये एका प्रवाशावर कोयत्याने हल्ला झाला. ही घटना आज सकाळच्या सुमारास घडली. ही बस इंदापूर आगाराची होती. बस काटेवाडी परिसरात आली असता, एका तरुणाने बाजूला बसलेल्या तरुणावर अचानक कोयत्याने वार केले. प्रवाशांनी भरलेल्या बसमध्ये ही घटना घडल्याने बसमध्ये गोंधळ उडाला. यानंतर हल्लेखोराने त्याच कोयत्याने स्वत:वर देखील वार करण्याचा प्रयत्न केला. तो स्वत:च्या गळ्यावर वार करणार इतक्यात बसमधील काही प्रवाशांनी प्रसंगावधान दाखवत त्याला अडवले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी या हल्लेखोराला ताब्यात घेतले व त्याची कसून चौकशी करण्यास सुरुवात केली.

## मतदार याद्यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहात गोंधळ! कामकाज तहकूब

■ नवी दिल्ली

**संसदेच्या** पावसाळी अधिवेशनात आज दोन्ही सभागृहात बिहार मतदार याद्या पुनर्पडताळणीवरून झालेल्या गोंधळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे लागले. लोकसभेप्रमाणेच राज्यसभेतही याच मुद्द्यावर गदारोळ झाला. त्यामुळे दिवसभर कामकाज झाले नाही. राज्यसभेत आज कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर उपाध्यक्ष हरिवंश यांनी आपल्याकडे ३० स्थगन प्रस्ताव आले असून आपण ते फेटाळत असल्याचे म्हटल्याने गोंधळाला सुरुवात झाली. बिहार मतदार याद्या पुनपुनर्पडताळणीवर चर्चा घेता येणार नाही, असे त्यांनी सांगितल्यानंतर गोंधळ अधिकच वाढला. त्यानंतर राज्यसभेचे कामकाज आधी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. त्यानंतर १२ वाजता कामकाज सुरू झाल्यावरही गोंधळ सुरुच राहिल्याने कामकाज दिवसभरासाठी तहकुब करण्यात आले. लोकसभेचे कामकाज आज सकाळी सुरू झाले. त्यानंतर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. यावर विरोधी पक्षांनी आक्षेप घेत बिहार मतदार याद्या पुनर्पडताळणीवर चर्चा घेण्याची मागणी केली. अध्यक्षांनी प्रश्नोत्तराचा तास पुढे चालूच ठेवल्याने विरोधकांनी गोंधळ घातला. त्यामुळे सभागृहाचे काम २ वाजेपर्यंत तहकुब करण्यात आले. पुन्हा काम सुरु झाल्यानंतरही गोंधळ सुरुच राहिल्याने अध्यक्षांनी लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले.

## हिमाचलमध्ये दरडी कोसळल्या ३१७ रस्ते बंद! शाळा-कॉलेज बंद

■ सिमला

**हिमाचल** प्रदेशमध्ये सध्या जोरदार पाऊस सुरू असून त्यामुळे जागोजागी दरडी कोसळल्या आहेत. यामुळे दोन राष्ट्रीय महामार्गासह लहान मोठे मिळून ३१७ मार्ग बंद झाले आहेत. अनेक ठिकाणी वीजपुरवठाही बंद पडला आहे.

हिमाचल प्रदेशात सर्वाधिक १७४ रस्ते मंडी जिल्ह्यात बंद पडले आहेत. किरतपूरहून मनालीला जाणाऱ्या महामार्गावर समलेटूजवळ दरड कोसळली. त्यामुळे चंदीगढला जाणारी वाहने नौणी-स्वारघाट मार्गाने वळवण्यात आली. शाहपूर येथील बोडू सारना तालुक्यात सारना गावातील एका व्यक्तीचे घर कोसळले. मंडी जवळ पंडोह बांध जवळ दरड कोसळल्याने चंदीगढ मनाली महामार्गही बंद झाला आहे. भरमौर-पठाणकोट हायवेही बंद झाला असून, चंबा ते तिसा मार्गही बंद झाला आहे. नकरोड-चांजूसह अनेक मार्गांवर दरड कोसळल्याने रस्त्यांवर माती व दगड आले आहेत. त्यांना हटवण्याचे काम सुरू करण्यात आले. आज हिमाचल प्रदेशातील शाळा, महाविद्यालये व आंगणवाड्या बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. हिमाचल प्रदेशातील पावसाचा फटका येथील वीजपुरवठ्यालाही बसला. अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर व विजेचे खांब पडल्याने अनेक भाग अंधारातच राहिले. पावसामुळे गेल्या महिन्याभरात १७३ लोकांचा बळी गेला आहे.

## गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्याची बहिणीसह विष पिऊन आत्महत्या

■ लखनौ

**गाझियाबादमध्ये** गुप्तचर विभागात (आयबी) कार्यरत असलेल्या २८ वर्षीय अधिकाऱ्याने आपल्या बहिणीसोबत विष पिऊन आत्महत्या केली. अविनाश कुमार असे मृत आयबी अधिकाऱ्याचे नाव आहे. तर अंजली कुमार (२५) असे त्यांच्या बहिणीचे नाव आहे. ही घटना कविनगर पोलीस स्थानकाच्या हद्दीतील गोविंदपूरममधील एच ब्लॉकमध्ये घडली.



काल सायंकाळच्या सुमारास अविनाश आणि त्यांची बहीण अंजली यांनी राहत्या घरात विष पिऊन आपले जीवन संपवले. या घटनेची माहिती मिळताच कविनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दोघांचेही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले. दरम्यान, अविनाशची आई २००७ साली वारली. त्यानंतर त्याच्या वडिलांनी दुसरे लग्न केले. सावत्र आई दोघांचाही छळ करत होती. यामुळे दोघांनीही आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला, असा आरोप अविनाशच्या मावशीने केला आहे.

## झिशान सिद्दीकी यांना धमकी देणाऱ्याला अटक

■ मुंबई

**माजी** मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर त्यांचे पुत्र आणि माजी आमदार झिशान सिद्दीकी यांना ई-मेलद्वारे जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोहम्मद दिलशाद नावेद या आरोपीला मुंबई विमानतळावरून अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याविरोधात लुकआऊट सर्क्युलर जारी करण्यात आले होते.

२१ एप्रिल रोजी झिशान सिद्दीकी यांच्या ई-मेलवर पहिली धमकी आली होती. सहा तासांनी दुसऱ्या ई-मेलद्वारे पुन्हा धमकी देत १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. यावेळी दाऊद टोळीच्या नावाचा उल्लेखही करण्यात आला होता. त्यानंतर झिशान सिद्दीकी यांनी तत्काळ वांद्रे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत सिद्दीकी यांचा जबाब नोंदवला होता. या प्रकरणाचा तपास करत पोलिसांनी आरोपी नावेदला अटक केली.

## मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यात जोरदार पाऊस कोसळणार

■ नवी दिल्ली

**यंदा** मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजे ऑगस्ट ते सप्टेंबर या काळात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे यावर्षी गणेशोत्सवातही जोरदार पाऊसधारा कोसळण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, ईशान्य आणि पूर्व भारताच्या भागातील राज्ये सोडली तर देशात बहुतांश भागांत या ऑगस्टमध्ये सरासरीइतका पाऊस पडेल. यंदा मान्सून दाखल झाल्यापासून जून-जुलैमध्ये सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला असून, हिमाचल प्रदेशात प्रचंड नुकसान झाले आहे.

गुरुवारी गुजरातमध्ये पावसाचा जोर वाढला असून, सरदार सरोवर धरणाचे पाच दरवाजे उघडण्यात आले. या प्रकल्पात पाणीपातळी १३१ मीटरपर्यंत पोहोचली आहे. राजस्थानातही बहुतांश भागांत पाऊस सुरू असून, मोठ्या नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. सखल भागांत पाणी साचल्याने अनेक गावांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. गुजरात, राजस्थानसह उत्तर भारतात उद्या २ ऑगस्टपर्यंत बहुतांश भागांत पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. दिल्लीत ३ ऑगस्टपर्यंत दिवसभर मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

## वानखेडे स्टेडियमच्या क्रिकेट संग्रहालयात गावस्करांचा पुतळा

■ मुंबई



**मुंबई** क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वानखेडे स्टेडियममध्ये एक क्रिकेट संग्रहालय उभारण्यात येणार आहे. या संग्रहालयात माजी भारतीय कर्णधार सुनील गावस्कर यांचा पुतळा बसवण्यात येणार आहे. त्याचबरोबर बीसीसीआय आणि एमसीएचे माजी अध्यक्ष शरद पवार यांचा पुतळादेखील येथे उभारण्यात येणार आहे. या संग्रहालयाचे नाव एमसीए शरद पवार क्रिकेट संग्रहालय असे ठेवण्यात आले असून त्याचे उद्घाटन या महिनाअखेरीस होणार आहे. एमसीएच्या या सन्मानाविषयी गावस्कर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, माझा पुतळा नवीन एमसीए शरद पवार क्रिकेट संग्रहालयाच्या प्रवेशद्वारावर ठेवण्याचा निर्णय एमसीएने घेतला आहे. मी एमसीएचा आभारी आहे. त्यांच्यामुळे मी क्रिकेटमध्ये माझे पहिले पाऊल टाकले आणि नंतर मला देशासाठी खेळण्याची संधी मिळाली. मी किती आनंदी आहे हे शब्दांत सांगू शकत नाही.

## शेअर बाजारात घसरण गुंतवणूकदारांना फटका

■ मुंबई

**मुंबई** शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ५८६ अंकांची घसरण झाल्याने गुंतवणूकदारांना मोठा फटका बसला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही २०० अंकांनी घसरण झाली.

शेयर बाजारात आज ऑगस्ट महिन्याची सुरुवात काहीशा नकारात्मक वातावरणात झाली. औषधनिर्माण क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांची मोठ्या प्रमाणात विक्री झाल्यानेही अस्थिरतेत वाढ झाली. जागतिक पातळीवरील नकारात्मक वातावरण व अमेरिकेच्या आयातशुल्क घोषणेमुळे बाजारात मंदीचे वातावरण राहिले. या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे सुमारे ५.२१ लाख कोटींचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## कंगनाविरुद्धचा मानहानी खटला रद्द करण्यास हायकोर्टाचा नकार



■ चंदीगड

**हिमाचल** प्रदेशच्या खासदार तथा बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतविरुद्धचा मानहानी खटला रद्द करण्यास नकार दिला. हा खटला रद्द व्हावा यासाठी कंगनाने पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ही याचिका न्यायालयाने फेटाळत कंगनाला मोठा झटका दिला. २०२१ मध्ये कंगनाने एक्स पोस्ट करून भटिंडातील बहादुरगड जंडिया गावातील रहिवासी असलेल्या ८७ वर्षीय वृद्ध महिला शेतकरी महिंदर कौर यांना १०० रुपये घेऊन सरकारविरोधी आंदोलनात सहभागी झाल्या, असे तिने म्हटले होते.

कंगनाच्या एक्स पोस्टनंतर कौर यांनी ४ जानेवारी २०२१ रोजी मानहानीचा खटला दाखल केला होता. या प्रकरणाची सुनावणी सुमारे १३ महिने चालली. भटिंडा न्यायालयाने कंगनाला समन्स बजावून तिला न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. यानंतर कंगनाने पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयात हा खटला रद्द व्हावा यासाठी याचिका दाखल केली होती.






## माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णा लैंगिक शोषण प्रकरणी दोषी

■ बंगळुरु

**आपल्या** मोलकरणीचे लैंगिक शोषण करून त्याचे व्हिडिओ व्हायरल करणारा, जनता दल सेक्युलरचा माजी खासदार प्रज्ज्वल रेवण्णा याला बंगळुरुच्या विशेष न्यायालयाने दोषी ठरवले आहे. त्याच्या शिक्षेची सुनावणी उद्या होणार आहे. प्रज्ज्वल रेवण्णावर २०२१ पासून त्याच्या मोलकरणीचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यावर तिने गेल्या वर्षी त्याच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर प्रज्ज्वल रेवण्णा जर्मनीत पळून गेला होता. तो लोकसभेचा उमेदवार होता व त्याच्या प्रचारासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आले होते. तो परदेशातून आल्यानंतर त्याच्यावर विशेष न्यायालयात खटला चालवण्यात आला. न्यायालयाने या संदर्भातील सुनावणी १८ जुलै रोजी पूर्ण केली. मात्र काही कारणासाठी हा निकाल पुढे ढकलण्यात आला. आज न्यायालयाने त्याला बलात्कार, धमकी, अश्लील छायाचित्रे सार्वजनिक करणे अशा विविध गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले आहे.



## काँग्रेसने भगव्या आतंकवादाचे नरेटिव्ह आणले! फडणवीसांची टीका

■ मुंबई

**माजी** पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या सरकारने भगवा आतंकवादाचे नरेटिव्ह तयार केले आणि हिंदू समाजाला दहशतवादी ठरवले. त्याचवेळी हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा भगवा असल्याची आठवण आली नव्हती का? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. फडणवीस पुढे म्हणाले की, मालेगाव प्रकरणाच्या निकालानंतर सर्वांच्या लक्षात आले असेल की, काँग्रेसने हिंदू टेरर किंवा भगवा आतंकवाद असे जाणीवपूर्वक नरेटिव्ह तयार केला होता, तो पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात आणि २००० च्या सुरुवातीच्या काळात संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणावर आतंकवादी हल्ले झाले. अमेरिका, युरोप आणि भारतामध्येही काही हल्ले घडले. या हल्ल्यांचे धागेदोरे थेट पाकिस्तानपर्यंत जात होते. त्यातूनच एक इस्लामिक टेररिझम अशा पद्धतीची भावना तयार झाली. ही भावना भारताने तयार केलेली नव्हती. मात्र, जगभरात या संकल्पनेचा स्वीकार होत असताना, काँग्रेसला आपल्या व्होट बँकवर याचा विपरीत परिणाम होतो आहे, असे जाणवले. म्हणूनच त्यांनी एक वेगळा नरेटिव्ह तयार केला. सर्व मुसलमान दहशतवादी आहेत, असे कोणीही म्हणत नव्हते.